सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १७ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक १६ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देणार का?

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला सवाल, 'वक्फ'वर उद्याही होणार सुनावणी

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सरकार मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देण्यास तयार आहे का? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केली. तसेच वक्फ कायद्याच्या निषेधार्थ देशभरात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी चिंता व्यक्त केली. दरम्यान, बुधवारची सुनावणी तहकूब करण्यात आली असून, आता गुरुवारीही युक्तीवाद सुरू ठेवण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.

वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात १०० हून अधिक याचिका दाखल झाल्या होत्या. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार, केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत. तर कपिल सिब्बल, राजीव धवन, अभिषेक मनु सिंघवी, सीयू सिंग हे कायद्याच्या विरोधात युक्तिवाद करत आहेत. आज अपीलकर्त्यांनी प्रामुख्याने वक्फ बोर्डाची स्थापना, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश आणि वादांचे निराकरण यावर युक्तिवाद केला आहे.



देशातअनेक जुन्या मशिदी आहेत. १४ व्या आणि १६ व्या शतकातील अशा मशिदी आहेत. याची नोंदणीकृत विक्री कागदपत्रे नाहीत. अशा मालमत्तांची

**मालमत्तांची नोंदणी कशी करणार : सरन्यायाधीशांचा केंद्राला सवाल**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, ' नोंदणी कशी केली जाईल, असा प्रश्न सरन्यायाधीश खन्ना यांनी केंद्र सरकारला विचारला. त्यांच्याकडे कोणती कागदपत्रे असतील? वापरकर्त्याने वक्फ प्रमाणित केले आहे, तुम्ही ते रद्द केले तर समस्या निर्माण होईल, असेही सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

**मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देणार का?**

न्यायमूर्ती कुमार म्हणाले, 'आम्हाला एक उदाहरण द्या. तिरुपती बोर्डातही बिगर हिंदू आहेत का? सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला विचारले की, सरकार मुस्लिमांना हिंदू धार्मिक ट्रस्टचा भाग बनण्याची परवानगी देण्यास तयार आहे का? हिंदू धर्मादाय कायद्यानुसार, कोणताही बाहेरील व्यक्ती मंडळाचा भाग असू शकत नाही. ती वक्फ मालमत्ता आहे की नाही हे तुम्ही न्यायालयाला का ठरवू देत नाही?, असा सवालही केंद्र सरकारला केला.

**हिंसाचारावर सरन्यायाधीशांनी व्यक्त केली चिंता**

सरकारने ८ एप्रिलपासून हा कायदा लागू करण्याची अधिसूचना जारी केली. तेव्हापासून त्याला सतत विरोध होत आहे. सुनावणीच्या शेवटी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी वक्फ कायद्यातील सुधारणांविरोधात पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, ' हिंसाचार ही एक खूप त्रासदायक गोष्ट आहे. जर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना असे प्रकार घडू नयेत,' अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

---

# न्यायमूर्ती भूषण गवई देशाचे ५२ वे सरन्यायमूर्ती म्हणून घेणार शपथ



नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश भूषण गवई ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत.विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची पुढील सरन्यायमूर्ती म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आगामी १४ मे रोजी न्यायमूर्ती गवई हे ५२ वे सरन्यायमूर्ती म्हणून शपथ घेतील.

विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होणार आहेत.त्यानंतर न्यायमूर्ती गवई १४ मे रोजी ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील आणि पदभार सांभाळतील. न्यायमूर्ती बी. आर. गवई हे २४ मे २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिने त्यांचा कार्यकाळ असेल. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी ते निवृत्त होतील. न्यायमूर्ती गवई हे भारताचे सरन्यायाधीश होणारे दुसरे दलित असतील. त्यांच्यापूर्वी २००७ मध्ये दलित न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन हे देशाचे सरन्यायाधीश झाले होते.

न्यायमूर्ती बी. आर. गवई मुळचे महाराष्ट्रातील आहेत. त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला आहे. १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १७ जानेवारी २००० रोजी नागपूर खंडपीठात सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली.

---

# न्यायालयाची स्वायत्तता सुरक्षित ठेवताना, उत्तरदायित्व दुर्लक्षित होता कामा नये

## न्यायालयीन जबाबदारी विषयावर अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेमार्फत ठराव पारित

छत्रपती संभाजीनगर : न्यायालयाची स्वायत्तता सुरक्षित ठेवताना, उत्तरदायित्व दुर्लक्षित होता कामा नये – हे उत्तरदायित्व व्यक्तीशी नव्हे, तर समाजाशी बांधील आहे, जे एक स्थायी यंत्रणेमार्फत पारदर्शक आणि पडताळता येण्याजोगे असावे असा ठराव अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत पारित करण्यात आला. ही बैठक १३ एप्रिल २०२५ रोजी आंध्रप्रदेशमधील विजयवाडा येथे पार पडली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष–के एस मूर्ती जी, राष्ट्रीय महामंत्री–डि भरत कुमार, राष्ट्रीय उपाध्यक्ष–मीराताई खडककार, राष्ट्रीय संघटन मंत्री–श्रीहरीजी बोरीकर, राष्ट्रीय सचिव–संजीवजी देशपांडे असे प्रमुख अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

१२–१३ एप्रिल दरम्यान झालेल्या या दोन दिवसीय अधिवेशनात देशभरातून २०० हून अधिक कायदे क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. देशातील सर्व उच्च न्यायालयांचे प्रतिनिधित्व झाले, अगदी अंदमान उच्च न्यायालयाचाही सहभाग होता. या अधिवेशनात वरिष्ठ वकील, सध्याचे व माजी कायदा अधिकारी – ज्यात भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल्स आणि माजी डव्होकेट जनरल्स यांचा समावेश होता – यांनी मोटार वाहन कायदा, धार्मिक प्रथा व प्रमाणपत्रांचा कायदेशीर दर्जा (विशेषतः हलाल प्रमाणपत्र) यावर सखोल चर्चा केली.

हा ठराव अलीकडील काही घटनांमुळे समोर आलेल्या उच्च न्यायालयांतील पारदर्शकता व प्रामाणिकतेबाबतच्या चिंता व्यक्त करतो. या पार्श्वभूमीवर



परिषदेने ठामपणे मत मांडले की,न्यायालयाची स्वायत्तता सुरक्षित ठेवताना, उत्तरदायित्व दुर्लक्षित होता कामा नये – हे उत्तरदायित्व व्यक्तीशी नव्हे, तर समाजाशी बांधील आहे, जे एक स्थायी यंत्रणेमार्फत पारदर्शक आणि पडताळता येण्याजोगे असावे.

**अधिवक्ता परिषदेमार्फत मंजूर ठराव:**

न्याय व्यवस्थेशी संबंधित अलीकडील काही घटनांनी पुन्हा एकदा संपूर्ण देशाला हादरवले आहे. अधिवक्ता परिषद विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींशी संवाद साधत आहे आणि उच्च न्यायालय व खालच्या न्यायालयात काम करणाऱ्या वकिलांकडून याबाबत अभिप्राय मिळवत आहे. या पार्श्वभूमीवर पुढील मागण्या मांडण्यात आल्या:

१. न्यायमूर्तींची नियुक्ती व त्यांच्या वर्तनावर देखरेख यासंबंधी अधिक पारदर्शक पद्धतीने प्रक्रिया राबवण्यासाठी नवीन कायदा त्वरित लागू करण्यात यावा. मात्र, या प्रक्रियेत न्यायपालिकेला महत्त्वाची भूमिका असावी. २. नवीन कायदा लागू होईपर्यंत, उच्च न्यायालयातील नियुक्तीसाठी सध्या असलेली कोलेजियम प्रणाली सुरु ठेवावी, पण त्यात अधिक पारदर्शकता आणावी. ३. सध्याचे न्यायाधीश यांच्या जबाबदारी व वर्तनावर देखरेख करण्यासाठी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने माजी सरन्यायाधीश, माजी उच्च न्यायालय प्रमुख व अन्य मान्यवर व्यक्तींचा समावेश असलेली **स्थायी समिती** त्वरित स्थापन करावी. बेंगळुरुतील न्यायमूर्तींच्या परिषदेमध्ये करण्यात आलेल्या जाहीरनाम्याची अंमलबजावणी ही समिती करेल. ४. ही समिती जून २०२५ पूर्वी स्थापन न झाल्यास, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायपालिका संबंधित तक्रारींवरची सर्व अडथळे दूर करावीत. न्यायालयापाशी काहीही लपवण्यासारखे नसावे. ५. जर उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या कुटुंबीयांचे त्याच राज्यातील न्यायालयांमध्ये वकिली चालू असेल, तर अशा न्यायाधीशांना बदलीची नोटीस द्यावी. ६. जर न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयात असतील, तर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी त्या न्यायाधीशाच्या निवृत्तीनंतरच सर्वोच्च न्यायालयात वकिली करावी. ७. निवृत्तीनंतरच्या कोणत्याही नियुक्ती किंवा लवादासाठी, किमान तीन वर्षांचा *'कूलिंग पीरियड'* सक्तीचा करावा व त्यासाठी संबंधित कायदे बदलावेत. ८. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या भविष्यातील न्यायाधीशांची *समान निवृत्तीवयाची अट* लागू करावी. ९. उच्च व सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश व त्यांच्या कुटुंबियांची संपत्ती वर्षातून एकदा संबंधित न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करावी. १०. प्रत्येक उच्च न्यायालयामध्ये एक–तृतीयांश न्यायाधीश हे इतर न्यायालयांतून असावेत. ही प्रणाली न्यायमूर्ती एम.एन. वेंकटचलैय्या यांच्या कार्यकाळात सुरू करण्यात आली होती आणि अंशतः लागूही झाली होती.

---




| | 125 NEON | 125 CARBON FIBRE | NS 125 BASE | N160 TWIN DISC | N160 USD |
|---|---|---|---|---|---|
| बचत | ₹1 184/-* | ₹2 000/-* | | | ₹5 914/-* |
| खास किंमत (बचत झाल्यावर) | ₹85 594/-* | ₹92 282/-* | ₹99 994/-* | ₹1 22 722 /-* | ₹1 36 992/-* |

*एक्स-शोरूम क़ीमत

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | BAJAJ CREDIT

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स–शोरुम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स–शोरुम किंमत 31 मार्च 2025 नुसार. *पल्सर 125 निऑनसाठी डाउन–पेमेंट म्हणजे मार्जिन मनी. मार्जिन मनीमध्ये DCC शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत आणि ते क्रेडिट पॅरामीटर्सच्या पूर्ततेवर आधारित आहे. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. • **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 7276183895**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सदस्य नोंदणी अभियानात सहभाग नोंदवून मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी करा -आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शिवसेना संपर्क कार्यालय भाग्यनगर येथे शिवसेना सदस्य नोंदणी अभियान अंतर्गत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री तथा अर्जुनरावजी खोतकर तसेच मराठवाडा निरीक्षक अशोक पटवर्धन यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी उपस्थित शिवसेना - युवासेना - महिला आघाडी पदाधिकारी कार्यकर्ते शिवसैनिकांशी संवाद साधताना माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेना पक्ष वाढी संदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले आपण हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने महाराष्ट्रातील प्रत्येक गावागावात पोहोचून २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण हा विचार डोळ्या समोर ठेवून आपण कार्य करतो. या संगणकीय युगामध्ये आपण जास्तीत जास्त लोकांशी संपर्कात राहू शकतो त्यांची संवाद साधू शकतो व आपला जो काही संदेश माहिति किंवा प्रचार प्रसार करायचा असेल तर तो सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण जास्तीत जास्त लोकांपर्यंत तो पोहोचू शकतो त्यामुळे आधुनिक ते कडे सुद्धा आपल्याला ओळख सोशल मीडियाच्या



वेगवेगळ्या माध्यमांवरती सक्रिय होऊन आपला प्रचार प्रसार त्या सुद्धा माध्यमातून आपण प्रचार प्रसार करू शकतो आपण ते करतोय त्याचबरोबर प्रत्येक शिवसैनिकांनी आपापल्या क्षेत्रातील विभागातील गावातील लोकांशी थेट संवाद साधना संदर्भात आपल्या दैनंदिन जीवनातील वेळेतील काही वेळ काढून लोकांशी संवाद साधण्याचा दिनक्रम ठरवावा. या वेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्याला जी शिकवण दिली व कार्यपद्धती सांगितली याला डोळ्यासमोर ठेवून सर्व जण सदस्य नोंदणी अभियानात सहभाग नोंदवून मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी करा.

आपण सर्व जण हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे कर्मठ शिवसैनिक आहोत त्यांच्या विच-राराने समाजात वावरणाऱ्या प्रत्येक बांधवांपर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या अडचणींचे निवारण करण्याचं काम आपण करत आलो आणि सदैव हे कार्य सुरूच आहे. याप्रसंगी उपस्थित सर्व शिवसैनिकांना आपल्या संघर्षाच्या काळातील जुन्या आठवणींना उजाळा देऊन प्रेरणा देण्याचे काम केलं. या प्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना मराठवाडा निरीक्षक अशोक पटवर्धन यांनीही आपले मत या प्रसंगी व्यक्त केले. शिवसेना पक्ष मुख्यनेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेकरिता केलेल्या कल्याणकारी योजना व विकास प्रकल यांची माहिती देऊन आपण आपल्या पक्षाची विकास प्रिय भूमिका लोकांसमोर मांडू शकतो. ज्या मुळे शिवसैनिकांना आपल्या शिव-सेना परिवारात सहभागी सदस्य नोंदणी अभियानाला आणखी चालना मिळेल या प्रसंगी उपस्थित सर्व शिवसैनिकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कार्यक्रमाला शिवसेना संपर्क प्रमुख, पंडित दादा भुतेकर, जिल्हा प्रमुख, भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहर प्रमुख विष्णु पाचफुले, विजया चौधरी, सह संपर्कप्रमुख,कालिंदाताई ढगे जिल्हा प्रमुख, अमोल ठाकूर, युवासेना जिल्हा प्रमुख, अजय कदम,जिल्हाप्रमुख, गणेश मोहिते उपजिल्हाप्रमुख, दीपक वैद्य शहरप्रमुख, ज्योती म्हस्के, तालुका प्रमुख, तसेच सर्व शिवसेना - युवासेना - महिला आघाडी पदाधिकारी शिवसैनिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### फुले चित्रपटासाठी काकडे यांचे सेन्सॉर बोर्डाला पत्र

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले यांचा चित्रपट दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्त प्रदर्शित करण्यात येणार होता. पण या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने परवानगी नाकारली आहे. या चित्रपटाला परवानगी न देण्यामागचे कारण व लेखी खुलासा सिद्धेश्वर काकडे यांनी सेन्सॉर बोर्डाकडे मागितला आहे. सेन्सॉर बोर्डाला काकडे यांचे पत्र प्राप्त झाल्या पासून १० दिवसाच्या आतमध्ये खुलासा देण्यात यावा अन्यथा सदरील पत्र पुरावा म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे याचिका दाखल करण्यात येईल असे काकडे यांनी म्हटले आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य खुप मोठे आहे. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी कायदेशीर लढा द्यावा लागतो. ही सेन्सॉर बोर्डाची चुकी आहे. असे काकडे यांनी म्हटले आहे. फुले हा चित्रपट प्रदर्शित न होण्या मागचे कारण व या चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने परवानगी नाकारली आहे. या बाबत सिद्धेश्वर काकडे यांनी पत्र पाठवून लेखी खुलासा मागितला आहे.

### तळणी येथे महामानवाच्या जयंतीनिमित्त मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी येथे चक्रवर्ती सम्राट अशोक,राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली व महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीत डीजेच्या तालावर तरूणाई चांगलीच थिरकली.

या तिन्ही महामानवाच्या विविध रूपातील भव्य प्रतिमा जिवंत घोड्यांच्या रथावर विराजमान केल्या होत्या. हे रथ आकर्षक विद्युत रोषणाईने सजवून प्रकाशमान करण्यात आले होते. प्रमुख मार्गाने निघालेल्या या मिरवणुकीत डी. जे. साउंड सिस्टीमच्या तालावर तरूणाई चांगलीच थिरकली. विशेषतः महिलावर्गाचा उत्साह चांगलाच दिसून आला. महिलांनी सुध्दा डॉ. बाबासाहेबांच्या जी-वनावर आधारित गीतांवर ताल धरून मनमुराद आनंद लुटला. या मिरवणुकीत इतर सर्व बांधव स्वयंस्फूर्तीने सहभागी झालेले होते. समितीच्या वतीने थंड पाण्याची व्यवस्था केली होती. दुपारी ५ वाजेपासून वसंत नगर येथुन निघालेली मिरवणूक बस्टन्ड चौक,महाराणा प्रताप चौक,माळी गल्ली,मुस्लिम गल्ली,वडार गल्ली या मार्गाने मार्गक्रमण करून रथ नालंदा बौद्ध विहार या ठिकाणी मार्गस्थ झाली . याठिकाणी सामुहिक त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रम समारोप करण्यात आला. मिरवणूक मार्गावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणूक शिस्तीत व शांततेत पार पडली.

### भारतरत्न डॉ.आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालयात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक, क्रांतिकारी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भाजपा जिल्हा कार्यालय, जालना व मस्तगड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, जिल्हा सरचिटणीस अमोल कारंजेकर, राजेश जोशी, देविदास देशमुख, शिवराज जाधव, जगदीश येनगुपटला, सोमेश काबलीये, संतोष खंडेलवाल, विकास कदम, सागर वाहूळकर, डोंगरसिंग साबळे, गौरव गोधेकर, आदींची उपस्थिती होती.

# रोड रॉबरी करणारे तीन चोरटे पोलिसांनी पकडले

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अबंड तालुक्यातील सोमवारी रात्री पत्रकार राघुंडे हे अबंड हुन आपल्या घरी जात असतांना त्यांचा पाठलाग करत रोडवर दुचाकी आडवी लावून तोंडाला रुमाल बांधलेल्या तीन चोरट्यांनी त्यांच्या गळ्याला चाकू लावत स्प्रे मारून लुटले हि घटना सुखापुरी -शहागड रोडच्या मध्यभागी घडली यावेळी राखुंडे यांनी गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांना संपर्क साधला यावेळी आशिष खांडेकर यांनी तत्काळ त्यांचे सहकारी पोलिस कर्मचारी पो.का. दिपक भोजने व शाकेर सिद्दिकी यांना घटनेची माहिती देत चोरटे ज्या दिशेने पळाले त्या दिशेची माहिती देत पाठलाग करण्याचे सांगुन ते हि पोलिस वाहन घेऊन येत असल्याची माहिती दिली. मिळाल्या माहिती वरण तत्काळ दिपक भोजने, शाकेर सिद्दिकी यांनी शहापूर -धाकलगाव रोडवरण रोड रॅबरी करणाऱ्या चोरट्यांचा शहापुर - धाकलगाव रोडवरण पाठलाग केला दिपक भोजने यांनी तिन्ही चोरट्यांना अडवण्यासाठी आपली दुचाकी रोडवर आडवी लावली सुसाट वेगाने असलेल्या चोरट्यांनी त्यांच्या ताब्यातील दुचाकी वेगात दिपक भोजने यांच्या अंगावर घातली त्यांनी स्वतःला सावरत एक चोरट्याला पकडले तर दोन चोरटे दुचाकी घेत पाळावे यां चोरट्यांचा पाठलाग शाकेर सिद्दिकी यांनी केला यावेळी गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी चालक गणेश मुंडे,अदील शेख, सय्यद आशा तिघांनी अवघ्या पंधरा मिनिटात येत चोरट्यांचा पाठलाग करत मोठ्या शिताफिने धाकलगाव कडे दुचाकीवरण पळालेला दोन चोरट्यांना पकडले. या तिन्ही चोरट्यांना अंबड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलेले असून गोंदी पोलिसांनी पाठलाग करत तीन रोड रॅबरी करणारे चोरटे पकडलेले आसून या चोरट्याना पकडायला गेलेले पोलिस कर्मचारी दिपक भोजने यांच्या अंगावर दुचाकी घातल्याने दिपक भोजने यांच्या डाव्या पायला दोन जागी फ्रॅक्चर झालेला आसून या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात फिर्यादी मदन अर्जुनराव राखूंडे ४५ वर्ष पत्रकार या.सुखापुरी यांच्या फिर्यादीवरण ते १४ एप्रिल रोजी रात्री पावणे अकरा वाजता जालना-अंबड राज्य महामार्गावरील अबंड हुन घरी सूखापूरी फाटा कडे जात असतांना मदन अर्जुनराव राखूंडे ४५ वर्ष हे गल्हाटी नदी जवळ त्यांना गोंदी पोलिसांनी पकडलेल्या आरोपी लक्ष्मण केशव गाडेकर वय १८ वर्ष , योगेश विष्णू पांढरे वय १८ वर्ष दोघे रा.कोठी. ता.घनसावंगी , अमोल शिवाजी पांजरे रा.तिर्थपूरी या तिघांनी मिळून मदन अर्जुनराव राखूंडे हे दुचाकीवर जात असतांना राखुंडे यांचा पाठलाग करत त्यांच्या दुचाकीच्या समोर दुचाकी आडवी लावत तिन्ही चोरट्यांनी राखुंडे यांची मोटरसायकल थांबवून चाकूचा धाक दाखवत तुझ्याकडे जे काही आहे ते काढून दे नाहीतर तूला जिवे ठार मारु असे धमकावत खिशातील रोख तीन हाजार रुपये व मोबाईल जबरदस्तीने घेवून पळून जातांना फिर्यादीचा मोबाईल फेकून देत फोडून टाकला या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात तिन्हीं आरोपी विरोधात कलम ३०९ (४) १२६(२) ३२४(४) ३५१ (२) सह ३ (५) भा. न्या सहिंता २०२३ अन्वये गुन्हा दाखल दाखल झालेला असून आरोपीकडून धारदार खंजीर ,बजाज कंपनीची डिस्कवर दुचाकी एम.एच. २१ सी. ए. ६५५३, तीन विविध कंपनीचे मोबाईल, रोख रक्कम दिड हाजार रुपये असा एक लाख ४२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आसून पुढील तपास उपनिरीक्षक श्रीमती बागलाणे या करीत आहेत. या प्रकरणी तिने आरोपीला अंबड न्यायालयात हजर करण्यात आलेले असतांना त्यांना पोलीस कोठडी मिळालेली असून, अंबड गोंदी पोलीस ठाणे हाद्दीतील पाच ते सहा रोड रॉबरीची गुन्हे उघडे होण्याची शक्यता आहे.



जालना शहरातील मस्तगड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पुतळ्यास जालना जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण, प्रदेश सरचिटणीस शकुंतलाताई कदम, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, शहर कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, महिला जिल्हाध्यक्ष वंदना खांडेभराड,प्रभाकर घेवंदे,सतीश वाहूळे,अमोल खरात,रोहित अग्रवाल,प्रतापराव लहाने,महिला शहराध्यक्ष रिंकल तायड,संगीता झाडीवाले, शितल बारोटे, उमेश मोहिते,आकाश श्रीरामवार, शिवचरण बाळराज, नवनाथ लोखंडे, सचिन इरछे, मच्छिंद्र राठोड, परमेश्वर कापसे, धनराज लहाने आदी.

# महायुती सरकारचे धोरण म्हणजे शेतकऱ्यांचे मरण- संतोष सांबरे

## शिवसेनेचे कारभारी म्हसलेकर यांचे सरणावर झोपून उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील केळीगव्हाण येथे शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व विविध मागण्यांसाठी शिवसेनेचे कारभारी म्हसलेकर यांनी सरणावर झोपून आमरण उपोषण सुरू केले असून माजी आमदार संतोष सांबरे यांनी यावेळी उपोषणाला भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली.

यावेळी बोलताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की, निवडणूकीत खोटे आश्वासन देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करत सत्तेवर आलेल्या मस्तवाल सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी असो, पीकविमा असो किंवा शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना या सरकारने गुंडाळून ठेवल्या आहे, ईव्हीएम च्या जोरावर निवडून आल्यावर सरकारने गोरगरीब शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळ मांडला असून सरकार मधील भ्रष्टाचाराने बरबटलेले मंत्री रोज नवनवीन वक्तव्य देऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहे. फडणवीस- शिंदे- अजित पवार सरकारच्या काळात महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी वाढतच असून या गोष्टींना आळा घालण्यास हे सरकार पुर्णतः अपयशी ठरले आहे. हे उद्योगधार्जिणे सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याऐवजी उद्योगपतींना कर्जमाफी देत आहे. सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे



राज्यातील शेतकरी देशोधडीला लागला असून त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ या सरकारने आणली आहे. सरकारने शेतकऱ्यांच्य सहनशीलतेचा जास्त अंत न बघता सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी यावेळी माजी आमदार संतोष सांबरे यांनी केली.

यावेळी माजी आमदार संतोष सांबरे यांच्या समवेत जिल्हासंघटक भानुदास घुगे, उपतालुकाप्रमुख संजय जाधव, रामेश्वर फंड, युवा सेना तालुकाप्रमुख भरत मदन, राजेंद्र गव्हाड, लक्ष्मण म्हसलेकर, परमेश्वर मात्रे, रामभाऊ म्हसलेकर, सोमनाथ मदन, पी डी मदन, किशोर मदन, सुभाष मदन, दत्तू मदन, निवृत्ती मदन, संभाजी मदन, शिवाजी करहाळे, अंकुश पवार, बाबुराव मदन, अतुल मदन, राजू मदन, काकासाहेब मदन, मथुराबाई मदन, इंदूबाई मदन, रुक्मिणीबाई मदन, सुनीताबाई मदन आदींची उपस्थिती होती

# शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर देणार -ए.जे.बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघात शिवसेना सदस्य मोहीम राबविण्यात येत असून शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर देणार असा विश्वास शिव-सेनेचे जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी दिला. परतुर येथे बुधवार ता. १६ रोजी आयोजित शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत श्री बोराडे बोलत होते. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी मोहन अग्रवाल, बाबासाहेब तेलगड, मंठा कृ.उ.बा. समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, सुदर्शन सोळंके, तालुकाप्रमुख अमोल सुरुंग, बाबासाहेब चिखले, शिवाजी तरवटे, विजयकुमार गिरी आदींची उप-स्थिती होती. यावेळी जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांकडून आढावा घेतला. तसेच परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये जास्तीत जास्त सदस्य नोंदणी



करणे, गाव पातळीवर शिवसेनेची संघटनात्मक बांधणी करणे आणि शिवसेनेच्या शाखा स्थापन करण्यावर भर देणे याविषयी बैठकीत चर्चा करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेनेला मोठे यश मिळेल असा विश्वास श्री बोराडे यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना पक्षवाढी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीत मोहन अग्रवाल, बाबासाहेब तेलगड यांनी सूचना मांडल्या. या बैठकीला सरपंच,उपसरपंच यांच्यासह परतूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# बोगस शेतकरी दाखवून जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अनुदानाची रक्कम लाटली

## तात्काळ निलंबनासह फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आ.बबनराव लोणीकरांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

२०२२-२३ यावर्षी झालेली अतिवृष्टी, पूर व गारपिटीमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे नुकसान प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले होते हे अनुदान शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित असतानाच उपविभागीय अधिकारी अंबड व भोकरदन तसेच तहसीलदार अंबड, घनसावंगी भोकरदन आणि जाफराबाद यांच्या संदर्भात आणि संबंधित तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी खऱ्या लाभार्थ्यांना लाभ न देता बोगस शेतकरी दाखवून त्या शेतकऱ्यांच्या नावे अनुदानाची कोट्यावधी रुपयांची रक्कम हडप केल्याचे प्राथमिक माहिती समोर आलेली आहे त्यानुसार संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी आणि चारही तहसीलदार यांना तात्काळ निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केली.



अतिवृष्टी पूर व गारपीट यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मोठ्या अशा अपेक्षा होत्या त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर देखील करण्यात आले परंतु त्या अनुदानापैकी ५० कोटी रुपये काही तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांनी हडप केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. खरे पाहता प्रत्येक गावात गारपीट पूर किंवा अतिवृष्टीच्या झालेल्या नुकसानाची पाहणी करताना तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी संयुक्त पाहणी करून त्याचा अहवाल सादर करणे अपेक्षित आहे या अहवालावर संबंधित तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांचे नियंत्रण असते परंतु प्रत्येक गावात लवकर नुकसान भरपाई मिळण्यासाठी नुकसानाची पाहणी करताना तिघांनी संयुक्त पाहणी न करता केवळ तलाठी किंवा ग्रामसेवक किंवा कृषी सहाय्यक यांनी एकट्याने नुकसानीची पाहणी केली व इतर दोघांनी त्यावर केवळ स्वाक्षरी केली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

घनसावंगी, अंबड, जाफराबाद व भोकरदन या तालुक्यांत १२,००० बोगस शेतकरी दाखवून त्यांच्या नावावर पैसे वळते केले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यासाठी तहसी-लदारांच्या लॉगिन व पासवर्ड वापरण्यात आला आहे ही बाब अत्यंत गंभीर असून यावर तह-सीलदारांचे नियंत्रण असणे अपेक्षित आहे परंतु तसे नियंत्रण असल्याचे दिसून येत नाही. तह-सीलदार यांचा लॉगिन व पासवर्ड वापरल्यानंतर देखील तहसीलदार लक्ष देत नसतील तर ही बाब अक्षम्य स्वरूपाची असून यामध्ये दोन्ही उपविभागीय अधिकाऱ्यांसह चारही तहसीलदार सहभागी आहेत काय याची देखील चौकशी होणे आवश्यक असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. अंबड व अहिल्यानगरमध्ये कार्यरत तलाठी दांपत्याने नातेवाइकांची यादी बँक खाते क्रमांकासह ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केली आहे असे देखील प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. डीबीटीद्वारे पैसे जमा झाल्यावर त्यांना पैसे मागितल्याने हा प्रकार उघडकीस आला व त्यामुळे या सर्व भ्रष्टाचाराचा भांडाफोड झाला आहे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची जबाबदारी असताना त्यांनी कुठलीही यादी ची फेर तपासणी केलेली नाही त्यामुळे बोगस लाभार्थी या यादीमध्ये समाविष्ट झाले यादी अपलोड करण्यापूर्वी फेर तपासणी करण्याची जबाबदारी तहसीलदार व उपविभागीय अधिकारी याची आहे या अपलोड केलेल्या याद्यांची फेरतपासणी न झाल्यामुळे थेट डीबीटीद्वारे संबंधितांच्या बँक खात्यात पैसेही जमा झाले. ज्याप्रमाणे तलाठ्यांनी अपलोड केलेल्या याद्यांची खातरजमा मंडळ अधिकारी व तहसीलदारांनी करणे अपेक्षित होते, ती करण्यात आली नाही. तसेच तह-सीलदार व उपविभागीय अधिकारी यांची जबाबदारी देखील नाकारता येत नाही यांच्या परवानगीशिवाय तलाठी ग्रामसेवक किंवा कृषी सहाय्यक एवढी मोठी भूमिका घेऊ शकत नाहीत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. प्राथमिक स्वरूपात अंबड, घनसावंगी या दोन तालुक्यात ५० कोटी रुपये बोगस लाभार्थींच्या नावे जमा झाल्याचे समोर आले आहे. सध्या गोपनीय चौकशी सुरू आहे. ती पूर्ण झाल्यानंतरच किती तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक सहभागी आहेत ते पुढे येईल. परंतु संबंधित दोन्ही उपविभागीय अधिकारी व चारही तहसीलदार या ठिकाणी कार्यरत राहिले तर निपक्षपाती चौकशी होऊ शकणार नाही कदाचित या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी जबाबदार असतील तर ते सर्व पुरावे मिटवण्यासाठी व हा भ्रष्टाचार येऊ नये यासाठी प्रयत्न करतील त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येऊन अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केली.




## टाटा एआयजीची नवी आधुनिक आरोग्य योजना

छत्रपती संभाजीनगर: टाटा एआयजी जनरल इन्श्युरन्स कंपनीने 'मेडिकेयर सिलेक्ट' सुरु करत असल्याची घोषणा आज केली आहे. ही आधुनिक आरोग्य विमा योजना आहे, रिटेल आरोग्य पोर्टफोलिओ अधिक मजबूत करणे आणि संपूर्ण भारतभर आरोग्य सेवा पोहोच वाढवणे हा याचा उद्देश आहे. व्यापक धोरणांतर्गत आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत आपले हॉस्पिटल नेटवर्क ११,५०० वरून १४,०००+ वर नेण्याचे टाटा एआयजीचे उद्दिष्ट आहे. कंपनीचे हे देखील अनुमान आहे की, या कालावधीत त्यांच्या आरोग्य विमा पोर्टफोलिओचा ३५% भाग द्वितीय आणि तृतीय श्रेणी बाजारपेठांमधून येईल, जो सध्या २६% आहे. ही बाब कमी सेवा पुरवल्या जात असलेल्या क्षेत्रांवर आणि सखोल रिटेल पोहोच वाढवण्यावर कंपनी जास्त लक्ष केंद्रित करत असल्याचे दर्शवते.

## जीता अपना घर स्पर्धा सुरू केली आहे.

मुंबई : भारतातील आघाडीचे डिजिटल ग्राहक क्रेडिट मार्केटप्लेस आणि मोफत क्रेडिट स्कोअर प्लॅटफॉर्म असलेल्या पैसाबाजारने आज त्यांच्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सल्लागारांसाठी 'जीता अपना घर' स्पर्धा सुरू करण्याची घोषणा केली. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीत सुधारणा करण्यासाठी आणि त्यांची स्वप्ने साध्य करण्यासाठी मदत करण्यासाठी सुरू केलेल्या पैसाबाजारच्या 'हर सपना होगा सच' या नवीन ब्रॅंड उद्दिष्टाशी हा नवीन उपक्रम सुसंगत आहे. 'जीता अपना घर' स्पर्धे अंतर्गत, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सल्लागारांना घर जिंकण्याची संधी मिळेल. यासोबतच, त्याच्या चांगल्या कामगिरीबद्दल त्याला रोख बक्षीस आणि विशेष सन्मान देण्यात येईल.

## अत्याधुनिक शस्त्रक्रिया करुन वाढवली अन्नप्राशनाची क्षमता

छत्रपती संभाजीनगर: - भारतीय वंशाच्या १८ वर्षीय मॉरिशसचा नागरिक असलेल्या मुलाच्या अन्ननलिके ला मोठी इजा झाली होती, त्यानी अपघाताने अल्कालाईन अशा द्रवाचे प्राशन केले होते, ज्यामुळे त्याची अन्ननलिका अकुंचन पावली होती. यामुळे तो द्रवपदार्थ सुध्दा पिऊ शकत नव्हता, ज्यामुळे त्याचे कुपोषण वाढले आणि वजन खूप वेगाने घटू लागले होते. त्यानंतर त्याच्यावर बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये मिनिमनली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करण्यात आली, ज्यामुळे आता तो खाऊ शकत आहे आणि पोषक घटक त्याला मिळू लागले आहेत. सुरुवातीला डॉक्टरांननी लेप्रोस्कोपिक जेंजुनोस्टॉमी केली, या शस्त्रक्रियेमध्ये अन्ननलिकेतून एक नळी थेट छोट्या आतड्यापर्यंत नेण्यात आली. या प्रक्रियेमुळे रुग्णाला आता पोषक घटक द्रवपदार्थाच्या स्वरुपात दिले जाऊ लागेल, ज्यामुळे दोन आठवड्यात त्याचे पोषण वाढले. त्याची प्रकृती स्थीर झाल्यानंतर त्याच्यावर गॅस्ट्रिक पुल अप सह थोराको-लेप्रोस्कोपिक इस्फागेक्टॉमी करण्यात आली.

## 'झापुक झुपूक' चं रोमॅंटिक गाणं 'पोराचा बाजार उठला रं' प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - जिओ स्टुडिओज प्रस्तूत आणि केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक' सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतच या सिनेमाचं शीर्षक गीत रिलीझ करण्यात आलं होतं ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता पुन्हा एकदा सिनेप्रेमींना भुरळ घालायला 'झापुक झुपूक' चित्रपटाचं नवं रोमॅन्टिक गाणं 'पोराचा बाजार उठला रं' प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. सूरज चव्हाण ,जुई भागवत आणि इंद्रनील कामतवर चित्रीत या गाण्यात या तिघांचा रोमॅन्टिक अंदाज पहायला मिळतोय. गाण्यात प्रेमाचा त्रिकोण आपण पाहू शकतो. अभिनेत्री जुई वर सूरज आणि इंद्रनीलचा जीव जडलाय.

## इंदुबाई बिर्ला यांचे निधन



सोयगाव,दि.१६ एप्रिल - येथील इंदुबाई राजमल बिर्ला(वय.८७) यांचे वृद्धापकाळाने मंगळवार रोजी रात्री ११:१५ वाजता निधन झाले.त्यांचेवर बुधवारी सायंकाळी ६:३० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पाच मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे.ते कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे चेअरमन तसेच भैरवनाथ महाराज मंदिर संस्थांचे अध्यक्ष दिलीप बिर्ला यांच्या त्या मातोश्री होत.

# एमजीएमची संगीत मैफल थाटात संपन्न

## 'भीम-फुले माणसाला भेटला'चे प्रभावी सादरीकरण



छत्रपती संभाजीनगर, दि. १६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्यावतीने क्रांतिसूर्य जोतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली 'भीम-फुले माणसाला भेटला' ही विशेष संगीत मैफल रुक्मिणी सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या प्रसंगी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, सौ.अनुराधाताई कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ,कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, भिक्षू संघ व सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे यांची उपस्थिती होती. मैफलीचे उद्घाटन अतिशय अनोख्या पद्धतीने करण्यात आले. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील 'आम्ही भारताचे लोक' हे वाक्य इंग्रजी, मराठी, हिंदी आणि तमिळमध्ये मान्यवरांनी लिहून एक प्रकारे भारतीय संविधानालाही नम्रपणे अभिवादन या प्रसंगी करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

संगीत मैफलीची सुरुवात जोतिबा फुले यांच्या 'विद्येविना मति गेली' या अखंडाने करण्यात आली. त्यानंतर फुलेंचा पानमळा फुलवा आज तुम्ही, भीमाच्या पायवाटेची जराशी धूळ मी आहे, आभाळातले तारे सारे आज आनंदी झाले गं, पेरा रे साखर पेरा, बरसती आग जे डोळे, वाट फुलेंची सोडून, सत्याचा पालनवाला अशा प्रकारे एकापेक्षा एक सरस, दमदार व तितक्याच अर्थपूर्ण रचनांचे सादरीकरण करीत 'भीम-फुले माणसाला भेटला, माणसांचा लढा आज पेटला' या महाकवी डॉ.वामनदादा कर्डक यांच्या गीताने मैफलीची सांगता झाली. राग यमन, तिलक कामोद, जोग, खमाज, भिन्न षड्ज, पहाडी, भटियार आणि भैरवी यांच्या स्वरमाधुर्यासोबत एकताल, तीनताल, दादरा, केरवा, रुपक आणि धुमाळीसारख्या तालांची धमाल या संगीत मैफलीचे खास आकर्षण होते. या सर्वांसोबत महापुरुषांच्या विचारांची गुंफण श्रोत्यांना विचारपथावर मार्गक्रमण करण्यासाठी प्रेरित करीत होती. विविध महापुरुषांच्या विचारांचे बाळकडू संगीताच्या माध्यमातून सातत्याने समाजाला देत असल्याबद्दल एमजीएम विद्यापीठ आणि विशेषतः कुलपती अंकुशराव कदम यांच्याविषयी गौरवोद्गार आणि धन्यतेचा भाव प्रत्येक श्रोत्याच्या मनात होता.

प्राध्यापक संजय मोहड यांनी या विशेष संगीत मैफलीची निर्मिती केली. आपल्या विज्ञाननिष्ठ निरूपणातून आणि आशयगर्भगीत-संगीत रचनांमधून त्यांनी ज्ञानाची आणि ध्यानाची एकात्म अनुभूति दिली. मेधा लखपति, विद्या धनेधर, वैष्णवी लोळे, उत्कर्षा बोचरे आणि सलोनी जुंबडे या विद्यार्थीनी कलावंतांनी दमदार गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या संगीत मैफलीत श्री. धीरेंद्र गावंडे (तबला), श्री. श्रीकांतपिसे (हार्मोनियम), श्री. निरंजन भालेराव (बासरी), श्री. राहुल जोशी (सहतालवाद्य)आणि श्री. गोपाल खोमणे (पखवाज, ढोलक, ढोलकी) यांनी अत्यंत समर्पक आणि सुरेख साथसंगत केली.

या विशेष संगीत मैफलीसाठी जाणकार श्रोत्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन महेश अचिंतलवार यांनी केले. कार्यक्रमाच्या सुव्यवस्थेची जबाबदारी डॉ. राजू सोनवणे आणि डॉ. योगिता महाजन यांनी पार पाडली.

## वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या कुमारी क्रांती निलेश गावडेचा सत्कार

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१६ एप्रिल

कै.शिवराम बहुद्देशु शिक्षण संस्था संचलित साईराज इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय जेऊर तालुका कन्नड यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित जिल्हास्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील



विद्यार्थीनी कु.क्रांती निलेश गावडे हीने प्रथम क्रमांक करून ११११११/-रूपये व सन्मान चिन्ह बक्षीस प्राप्त केल्याबद्दल सोयगाव शिक्षक मित्र परीवारा कडून कु.क्रांतीचा व तिच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.यावेळी फर्दापुर केंद्राचे केंद्रप्रमुख मोतीराम जोहरे,जंगलातांडा येथील मुख्याध्यापक रामदास फुसे,कै. बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,शाळेचे मुख्याध्यापक झगाजी पोतरे,रामजीनगर येथील मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,वेताळवाडी मुख्याध्यापक नितेश गवादे,महादू पंडीत,प्राध्यापक निलेश गाडेकर,केदारनाथ खताळ,जांभुळकर व क्रांतीचे पालक उपस्थित होते.

## णमोकार तीर्थ प्रचार रथ २५ शहरात फिरणार; संभाजीनगर येथे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते व्दितीय प्रचार रथाचे लोकार्पन संपन्न

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - प.पू. आचार्य श्री देवनंदीजी गुरुदेव यांच्या प्रेरणेने नाशिक जिल्हयातील मालसाने येथे निर्माणाधीन णमोकार तीर्थाचा प्रचार रथ भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवा निमित्त २५ शहरात फिरणार आहे. दरवर्षी जैन समाजातर्फे भ. महावीर जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या धूमधडाक्यात साजरा केला जातो. यानिमित्त प्रत्येक शहरात शोभायात्रा काढली जाते. यामध्ये विविध रथ शामिल होतात.

६ ते १३ फेब्रुवारी २०२६ रोजी णमोकार तीर्थाचा भव्य पंचकल्याणक महोत्सव संपन्न होणार आहे. त्या कार्यक्रमाची माहिती जनसामान्यांना व्हावी या उद्देश्याने प्रचार रथ बनविण्यात आले आहे. प्रथम प्रचार रथाचा उदघाटन पु.पू. आचार्य श्री देवनन्दिजी गुरुदेव एवं आचार्य श्री कुमूदनंन्दिजी गुरुदेव, मुनिश्री आर्षिकतीर्जी गुरुदेव यांच्या सानिध्यात णमोकार तीर्थ येथे




झाला. तसेच छत्रपती संभाजीनगर येथे अशाच प्रकारच्या रथाचे लोकार्पन शहराचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा.

न्या.कैलास चांदीवाल व माजी महापौर विकास जैन, गुरैभक्त परिवाराचे ललीत पाटणी यांची उपस्थिती होती. ६ ते १३ फेब्रवारी २०२६ रोजी दरम्यान होणा-या पंचकल्याणक महोत्सव हा कार्यकम आंतरराष्ट्रीय स्तरावर होणार असुन या महोत्सवाचे प्रचार प्रसार व्हावा यासाठी या रथाची निर्मीती करण्यात आली आहे. सदर रथ महाराष्ट्रात नाशिक, संभाजी नगर, कोपरगांव, नांदगाव, मालेगांव, कन्नड, सोलापुर, नांदेड, कोल्हापुर, अकलूज,पुणे, औंढा, पैठण, सहिते अनेक शहरात एकाच वेळी फिरणार आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

छत्रपती संभाजीनगर येथील प्रचार रथाच्या लोकार्पन वेळी आचार्य देवनंदीजी गुरैभक्त परिवाराचे नमोकार तिर्थाचे विश्वस्थ ललीत पाटणी, रवि पहाडे, विपीन कासलीवाल, देवेन्द्र काला महेंद्र ठोले, जितेंद्र पहाडे, प्रकाश ठोले, मानिकचंद गंगवाल प्रकाश कासलीवाल डॉ.आर.सी.बडजाते, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, वर्धमान बाकलीवाल, मनोज दगडा, विनोद लोहाडे, महावीर सेठी,एम.आर.बडजाते, डॉ.रमेश बडजाते,शैलेश पाटणी, भरत ठोले आर.आर.पहाडे, निलेश काला, मनोज पाटणी, बाहुबली गंगवाल, शैलेश पाटणी,श्री. क्षेत्र कचनेर चे अध्यक्ष सुनिल पाटणी, राजु चांदीवाल, संतोष कासलीवाल, मनोज चांदीवाल, महावीर गगवाल, सुनिल सेठी, वर्धमान कासलीवाल, महावीर कासलीवाल, जीवन गंगवाल, प्रकाश लोहाडे, विजय कासलीवाल, मनोज काला, मुकेशे कासलीवाल, दिलीप कासलीवाल, अमित कासलीवाल, हेमंत गंगवाल, भिकचंद लोहाडे, अनिल कासलीवाल आदींची यावेळी उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः-९२ विश्व हिंदू परिषद

दिनांक २४ नोव्हेंबर १९६३ ला श्री गुरुजींचा कार्यक्रम बेळगाव (कर्नाटक) ला होता. त्यांना खास करून भेटायला त्रिनिदादचे एक संसद सदस्य श्री शंभुनाथ कपिल देव आले होते त्रिनिदाद मध्ये हिंदूंना हिंदू संस्कार देण्याची कोणतीच व्यवस्था नव्हती. अगदी नामकरणापासून ते विवाहापर्यंत सारे संस्कार इसाई धर्मगुरू गिरिजा घरात करायचे. हे संस्कार हिंदू पद्धतीने करण्याकरता इथले पंडित-पुरोहित तिथे यावेत अशी त्यांनी गुरुजीं जवळ इच्छा व्यक्त केली. त्याआधी भारत सरकारने त्यांना त्यांची ही इच्छा आम्ही पूर्ण करू शकत नाही, कारण आम्ही सेक्युलर आहोत असे रोखठोक सांगितले होते. परंतु गुरुजी आणि देव या दोघांच्या वार्तालापाची उपलब्धता म्हणजे जगभरातील हिंदूंना प्रेरणा/ मार्गदर्शन / सहायता देण्यासाठी एक विश्वव्यापी संस्था स्थापित करण्याचा निर्णय झाला. आणि श्री गुरुजींनी त्याची जबाबदारी संघाचे जेष्ठ प्रचारक श्री शिवराम शंकर उपाख्य दादासाहेब आपटे यांच्यावर सोपवली. त्यानंतर दादासाहेब देशभरातील गणमान्य महानुभावांना भेटले. आणि मग २९-८-१९६४ ला श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर स्वामी चिन्मयानंदजींच्या आश्रमात म्हणजे सांदिपनी साधनालय मुंबई येथे विश्व हिंदू परिषदेची स्थापना झाली. या बैठकीत स्वामी चिन्मयानंदजी, स्वामी शंकरानंद सरस्वतीजी, शीख पंथाचे नेता मास्टर तारासिंह, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वतः श्री गुरुजी, नैरोबीचे श्री सूद एवं श्री पोद्दार, आणि त्रिनिदादचे श्रीराम कृपलानी, तसेच चारही पिठाचे शंकराचार्य, बौद्ध, जैन, शीख धर्मगुरु, अशा सर्व पंथ संप्रदायाचे आचार्य स्थापनेच्या बैठकीत होते आणि मग १९६६ च्या कुंभमेळ्यातील पावन पर्वत पहिले वैश्विक हिंदू संमेलन उत्तर प्रदेशातील प्रयाग येथे झाले त्यावेळी २२ देशातील २५000 प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. या संमेलनात खूप महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पहिला म्हणजे सकल हिंदू बंधू बंधू आहेत. हिंदु पतित होत नाही. हिंदवाः सहोदराः सर्वे, न हिंदुः पतितो भवेत् ॥ त्याचप्रमाणे अस्पृश्यतेला व जातीभेदांना हिंदू धर्माची मान्यता नाही. अशी स्पष्ट घोषणा परिषदेने केली. हिंदू म्हणजे प्रतिगामी- अंधश्रद्ध- जातीयवादी अशी रूढ कल्पना खोडून टाकली. आणि गर्वसे कहो हम हिंदू है हा विश्वासाचा भाव समाजात जागृत केला.

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## सोयगाव-सिल्लोड तालुक्याचे युवा नेते राहुल राठोड यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश



सोयगाव,दि.१६ एप्रिल : सोयगाव तालुक्यातील बंजारा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अथवा युवकांचा आधारस्तंभ असे युवा नेतृत्व तसेच नुकतेच विधानसभा निवडणुकीमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे अपक्ष उमेदवार राहुल राठोड,अमर राठोड,अरविंद राठोड यांचे भारतीय जनता पार्टीमध्ये कार्यकारी अध्यक्ष रवींद्रजी चव्हाण,माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते जाहीर प्रवेश करण्यात आले.यावेळी या प्रसंगी राज्याचे मंत्री अतुल सावे, राज्यसभा खासदार डॉ.भागवत कराड,आमदार नारायण कुचे,आमदार अनुराधा चव्हाण,आमदार संजय केनेकर, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी,सिल्लोड-सोयगाव विधानसभा प्रमुख सुरेश पाटील बनकर,ज्ञानेश्वर मोटे,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष पुष्पाताई काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## ग्रुप ग्रामपंचायत जांभळी उपसरपंचपदी मिना फय्याज शेख यांची निवड



बिडकीन दि १६ पैठण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय जांभळी उपसरपंच पदी मिना फय्याज शेख यांची बिनविरोध निवड, जांभळी ग्रामपंचायत सरपंच पदासाठी जनतेतून पाच वर्षासाठी निवडून आलेल्या शारदाबाई बद्रीनाथ कळसकर सरपंच पदावर असून उपसरपंच साठी अडीच वर्षासाठी सदस्य मधून निवड करण्यात येते,दि १५ एप्रिल रोजी ग्रामपंचायत कार्यालय जांभळी येथे सरपंच शारदाबाई कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली यावेळी आठ सदस्य यांनी मिना फय्याज शेख यांना उपसरपंच पदी साठी बिनविरोध निवडून दिले यावेळी महसूल मंडळ अधिकारी माधनगर मॅडम व ग्रामसेविका प्रज्ञा मैड यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली , मिना फय्याज शेख यांची उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल माजी सरपंच गणेश राठोड, अमोल कळसकर, अंकुश अवचेरमल , मनीषा आत्माराम कळसकर,जीवन राठोड, पिंटू कळसकर, रवि चव्हाण, रविंद्र ढोबळे, कल्याण चव्हाण, रमेश चव्हाण, दिगंबर चव्हाण, केशव राठोड, नवनाथ गाडेकर, जब्बार पटेल, संतोष ढोबळे, संदीप ढोबळे, कल्याण नाईक, आदींनी गुलाल उधळून फटाक्याची अतिश बाजी करून अभिवादन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विश्व हिंदू परिषदेतर्फे त्रेता युगातून कलियुगाच्या परिप्रेक्ष्यात वाल्मिकी रामायणातील स्त्रीशक्ती हा कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर - सीता ही रामायण महाकाव्याचा कणा असून सीतेने तिच्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय स्वतः घेतले आहेत. प्रभू रामाबरोबर वनवासाला जाण्याची कुठलीही अट नसताना सीतेने स्वतः होऊन प्रभुरामाबरोबर वनवासात जाण्याचा निर्णय केला.हनुमंतराय सीतेला अशोक वाटिकेत भेटण्यासाठी आले तेव्हा हनुमंताने सीतेला सोबत येण्याची विनंती केली तेव्हा सीतेने प्रभू रामचंद्रांनी लंकेत येऊन रावणासोबत युद्ध करून नंतरच मला येथून घेऊन जावे असे सांगितले हा निर्णय पण सीतेचाच होता. अशी रामायण काळातली अनेक उदाहरणे देऊन सीता विचारी सुजाण आणि वैचारिक पाया अत्यंत पक्का असलेली होती असे दिग्दर्शक सिनेनट लेखक श्री.अभिराम भडकमकर यांनी सांगितले




अभिराम भडकमकर विश्व हिंदू परिषद मातृशक्तीतर्फे दिनांक १३ एप्रिल रोजी आयएमए हॉल येथील आयोजित त्रेतायूगातुन कलियुगाच्या परिप्रेक्षात वाल्मिकी रामायणातील स्त्री शक्ती या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध उद्योगपती विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे उपाध्यक्ष सौ कुंदाताई अंदुरे मंदिर आयामाचे राजीव जहागीरदार आदित्य नेत्र रुग्णालयाच्या डॉक्टर सौ.दीप्ती कस्तुरे उपस्थित होत्या.

सदरील कार्यक्रमात विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष ,देवगिरी प्रांत तसेच प्रसिद्ध उद्योजक, मा.श्री संजय आप्पा बारगजे यांनी ही आपले विचार मांडले. आजच्या घडीला एकत्रीत कुटुंब पद्धती मोडकळीला आली आहे,शाळामधुन व भारतीय समाजामधुन मूल्य शिक्षण लोप पावत चालले आहे,प्राचीन काळी आपली स्त्री संस्कृती किती बलवान व आदर्श होती व यांची माहिती असणे किती आवश्यक झाले आहे,असे विचार त्यांनी मांडले.

या कार्यक्रमाची संकल्पना संभाजीनगर येथील आदित्य नेत्र रुग्णालयाच्या संचालिका डॉ.सौ दीप्ती कस्तुरे यांची होती. त्यांनी रचलेल्यारामायणम कल्पद्रुमम तील स्त्री पात्रांवर आधारित गितांचा स्वराविष्कार सादर करण्यात आला.संगीतकार श्री शांतिभूषण देशपांडे,सौ राजेश्री ओक व सौ वर्षा जोशी यांचे सुमधुर गायन,श्री गिरीश काळे(बासरी) श्री गजानन धुमाळ(तबला),श्री ललित चौबे(ईतर तालवाद्य)यांची साथसंगत लाभली.

अहिल्या,मंदोदरी,तारा व शबरी या व्यक्ती रेखांमधुन व रामकथेतुन आपण काय शिकु शकतो हा भाग डॉ.दीप्ती कस्तुरे यांनी आपल्या निवेदनातून मांडला विश्व हिंदू परिषदेच्या अनुराधा पुराणिक यांनी उत्तम सूत्रसंचालन केले कुंदाताई अंदुरे यांनी आभार मानले. श्रीमती नंदाताई क्षीरसागर राजश्री भिते सायली पिले सौ स्वाती जोशी सुनिता कळसकर, वसुधा कुलकर्णी सुषमा महाजन ज्योती गुरव कीर्ती डोणगावकर ऐश्वर्या घोंगडे ऋतुजा चौथे उषा पंगुडवाले अंजली गोरे अश्विनी घाडगे अभिषेक कादी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. या कार्यक्रमाला संभाजीनगर शहरातील संगीत क्षेत्रातील

मा.श्री.विश्वनाथजी ओक विश्व हिंदू परिषद पदाधिकारी शहरातील प्रतिष्ठित नागरिक,ईतर आप्त,मित्र व परिवाराचे सदस्य मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. आपल्या संस्कृती चे संवर्धन,जपणुक व शिकवण यांचे महत्व,नैतिक मूल्य यांचे पालन करणे व संस्कार किती महत्वाचे आहेत यावर वक्ते बोलले.स्त्री शक्ती जागरणावर यानिमित्ताने चांगले विचार मंथन झाले.

## आयएए ऑलिव्ह क्राऊन अॅवॉर्ड्स २०२५ मध्ये फास्ट फॅशन कॅम्पेनसाठी टेम्पेस्ट अॅडव्हर्टायझिंगला सुवर्ण पदक प्रदान

बंगळुरू, १० एप्रिल २०२५: भारतातील प्रतिष्ठित क्रिएटिव्ह एजन्सीजपैकी एक असलेल्या टेम्पेस्ट अॅडव्हर्टायझिंगने, आयएए (इंटरनॅशनल अॅडव्हर्टायझिंग असोसिएशन) ऑलिव्ह क्राऊन अॅवॉर्ड्स २०२५ मध्ये सुवर्ण पदक जिंकले. 'फास्ट फॅशन' या कॅम्पेनसाठी टेम्पेस्टला हा सन्मान मिळाला.

माध्यमांमधील शाश्वत व पर्यावरणपूरक विषयांवरच्या सर्वोत्कृष्ट व सृजनशील निर्मितीसाठी आयएए ऑलिव्ह क्राऊन अॅवॉर्ड्स दिले जातात. पुरस्कारप्राप्त 'फास्ट फॅशन' या कॅम्पेनमध्ये, आधुनिक एआय तंत्रज्ञानाने साकारलेल्या अप्रतिम चित्रांमधून फास्ट फॅशनचे गंभीर दुष्परिणाम प्रभावीपणे मांडलेले आहेत. विशिष्ट ध्येय बाळगून कल्पक निर्मिती करणारे टेम्पेस्ट हे एक अग्रेसर नाव असल्याचे या पुरस्काराने ठळकपणे अधोरेखित केले. २०% जागतिक सांडपाण्यासाठी जबाबदार असलेल्या व सर्वाधिक जलप्रदूषण करणाऱ्या वस्त्रउद्योगावर भर देऊन, ग्राहक व ब्रॅंड्सने आपली निवड व




निर्णयांविषयी अधिक जागरूक व्हावे, असे आवाहन ही कॅम्पेन करते. अति उत्पादन, अति वापर आणि शाश्वत पर्याय शोधण्याची आत्यंतिक निकड, याविषयीही ती भाष्य करते.

या कॅम्पेनची निर्मिती करणारी टीमः

संकल्पना व कॉपीः राघवेंद्र भट, क्रिएटिव्ह डायरेक्टर (कॉपी)

आर्ट व डिझाइनः लक्ष्मीकांत आमीनगड, क्रिएटिव्ह डायरेक्टर (आर्ट)

प्रोजेक्ट मॅनेजमेंटः झुबैर खान, मॅनेजर - ब्रॅंड स्ट्रॅटेजी

स्ट्रॅटेजिक मार्गदर्शन व नेतृत्वः अभिषेक जाना, व्ही.पी. ब्रॅंड स्ट्रॅटेजी व ब्रॅंच हेड, बंगळुरू

या कॅम्पेनच्या यशाबद्दल बोलताना अभिषेक जाना म्हणाले, ही कॅम्पेन म्हणजे केवळ पुरस्कार जिंकणारी एक कल्पना एवढीच मर्यादित नाही. ती डोळे उघडणारी, जागरूक करणारी भावना आहे. इतक्या महत्वाच्या समस्येबाबत आम्ही आमच्या व्यासपीठावरून आणि सर्जनशील माध्यमातून एक ठोस भूमिका घेऊ शकलो, याचा आम्हाला अभिमान वाटतो. एका अर्थपूर्ण कथानकाची ताकद काय असते आणि ते कशी कृतीशील जागृती घडवून आणू शकते, हे अशा पुरस्कारांमुळे सिद्ध होते. तुराब लकडावाला यांनी स्थापन केलेली टेम्पेस्ट अॅडव्हर्टायझिंग ही जाहिरात संस्था अर्थपूर्ण व प्रभावी संकल्पनांसाठी ओळखली जाते. २६ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेली ही संस्था, अनुभवसिद्ध प्रगती (Our Experience Delivers Growth) या तत्त्वासह वाटचाल करते आहे. सृजनशीलतेच्या प्रेरणेतून व्यावसायिक यश मिळविते आहे..

## अग्रलेख...

# मेहुल चोक्सीची अटक आणि पुढे...

२००८ च्या मुंबई हल्ल्यातील आरोपी असलेला पाकिस्तानी दहशतवादी तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणात भारताने यश मिळविल्यानंतर लगेच पंजाब नॅशनल बँकेची १३ हजार कोटी रुपयांनी फसवणूक करणारा कुख्यात हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये झालेली अटक ही आशादायी व आनंददायी बातमी आहे. भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे हे प्रतिबिंब असून, अशा प्रवृत्तींना ठेचले जाण्याची सामान्यांची आकांक्षा त्यातून पूर्ण होईल, अशी अपेक्षा निर्माण झालेली आहे. भारतीय तपास यंत्रणा जागतिक स्तरावर काय करू शकतात, याचा हा पुरावाही आहे. भारताच्या दागिने उद्योगातील बडी असामी आणि गीतांजली या ज्वेलरी ब्रॅण्डचा माजी मालक मेहुल चोक्सी हा देशातील सर्वांत मोठ्या आर्थिक घोटाळ्यांपैकी एकाचा म्हणजे पंजाब नॅशनल बँकेच्या फसवणुकीचा सूत्रधार. हिरे व्यापारातील जागतिक कीर्तीचे हे नाव. देशात अनेक ठिकाणी गीतांजलीचे शोरूम्स होते. पंजाब नॅशनल बँकेची बनावट लेटर ऑफ अंडरटेकिंग्ज तयार करून त्याने व नीरव मोदी या त्याच्या नातेवाईकाने परदेशी बँकांकडून कर्ज मिळविले होते. यात त्यांचे अन्य नातेवाईकही सहभागी होते. हे सारे प्रकरण उघडकीस आल्यावर एकच गदारोळ उडाला होता. लोक बँकिंग क्षेत्राच्या नावाने बोंबा ठोकायला लागले होते. बँकेची फसवणूक केल्यानंतर मेहुल चोक्सीने पळ काढला होता आणि अँटिग्वा आणि बारबुडामध्ये तेथील गुंतवणूक योजनेच्या माध्यमातून नागरिकत्व मिळविले होते. वर्षानुवर्षे फरार राहिल्यानंतर बेल्जियममधील अँटवर्प येथे त्याला अटक झाली आहे. आता काही औपचारिकता पूर्ण करून लवकरात लवकर त्याला भारतात आणले जाईल, अशी अपेक्षा आहे. मेहुल चोक्सीच्या प्रकरणात बरीच गुंतागुंत आहे. त्याचे अनेक ठिकाणचे नागरिकत्व आणि प्रत्यार्पण टाळण्यासाठी कायदेशीर युक्त्या अशा अडचणी येणे संभवते. मात्र, या अडचणींच्या पल्याड जाऊन आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि कायदेशीर तरतुदींचा फायदा घेऊन ही अटक घडवून आणली गेली हे भारताचे मोठे यश आहे. त्यामुळे त्याला भारतात आणण्यातही यश येईल, अशी आशा वाटते.

भारतीय बँकिंगच्या इतिहासात सर्वांत मोठ्या आर्थिक घोटाळ्यांमधील एक घोटाळा म्हणजे मेहुल चोक्सीचा पंजाब नॅशनल बँक घोटाळा. हा घोटाळा देशाच्या आर्थिक आणि कायदेशीर व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरला. या प्रकरणातील प्रमुख आरोपी, मेहुल चोक्सी अनेक वर्षे परदेशात लपून होता. हा घोटाळा साधासुधा नव्हता. हा भारतीय बँकिंग सिस्टिममध्ये असलेल्या आर्थिक शिस्तीवरील आणि दक्षतेवरील हल्लाच होता. बँकेतील काही कर्मचाऱ्यांशी संगनमत करून मेहुल चोक्सीने बँकेला १३ हजार कोटींचा चुना लावला आणि तो भारतातून पळून गेला. त्याच्या पलायनामुळे एकूणच भारतीय व्यवस्था व सरकारपुढे मोठे आव्हान उभे राहिले होते. विदेशात राहून मेहुल चोक्सी स्वतःविरुद्धच्या सर्व आरोपांना बगल देण्याचा आणि कायदेशीर कारवाई टाळण्याचा प्रयत्न करीत होता. भारत सरकारने मात्र सर्व स्तरांवर प्रयत्न चालू ठेवले. इंटरपोल रेड कॉर्नर नोटीस जारी केली गेली. न्यायालयीन आणि मुत्सद्देगिरीच्या पातळीवर प्रयत्न झाले. गेल्या काही महिन्यांत मेहुल चोक्सीच्या अँटिग्वामधून बाहेर पडण्याच्या संशयास्पद हालचालींच्या पृष्ठभूमीवर ही अटक भारतासाठी निर्णायक ठरली आहे. आर्थिक गुन्हेगारीविरोधातील भारताच्या लढ्यातील एक महत्त्वाची कामगिरी म्हणून या अटकेकडे पाहिले पाहिजे.

भारत सरकारच्या विविध यंत्रणांनी- विशेषतः केंद्रीय अन्वेषण विभाग, अंमलबजावणी संचालनालय आणि परराष्ट्र मंत्रालयाने समन्वय साधून आंतरराष्ट्रीय कायदा आणि कूटनीतीचा वापर करीत मेहुल चोक्सीविरोधातील पुरावे सादर केले. अँटिग्वा सरकारवर कायदेशीर आणि मुत्सद्देगिरीद्वारे दबाव आणण्यात आला. चोक्सीचे नागरिकत्व रद्द करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया देखील त्यामुळे सुरू झाली. मेहुल चोक्सी आपल्या पत्नीसह बेल्जियमच्या अँटवर्प शहरामध्ये राहायला लागल्याचे कळल्यावर बेल्जियम सरकारकडे त्याच्या प्रत्यार्पणासाठी रीतसर अर्ज दाखल करण्यात आला. त्याची परिणती म्हणून त्याला तिकडे अटक झाली आहे. कुणीही उठावे आणि बँकांना लुटून विदेशात पळून जावे, असा आता भारताचा लौकिक राहिलेला नाही हे यावरून दिसते. मेहुल चोक्सीसारख्या आर्थिक गुन्हेगाराला न्यायालयासमोर उभे करणे ही भारताच्या दृष्टीने केवळ कायदेशीर औपचारिकता नाही. ती राजकीय इच्छाशक्तीचेही प्रतीक आहे. पंतप्रधान कार्यालय, गृह मंत्रालय आणि अर्थ मंत्रालय या सर्वांनी या प्रकरणात विशेष लक्ष दिले.

भारताचे मेहुल चोक्सीला अटक करून घेण्यातील यश कौतुकास्पद असले तरी अनेक हाय-प्रोफाईल आरोपी अजूनही फरार आहेत. मेहुल चोक्सीचा नातेवाईक नीरव मोदी हा त्यातलाच एक. तो सध्या ब्रिटनमध्ये तुरुंगात आहे. त्याच्याही प्रत्यार्पणाचे प्रयत्न सुरू आहेत. आंतरराष्ट्रीय तस्कर व अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम, एकेकाळचा मद्यसम्राट विजय माल्या असे अनेक गुन्हेगार भारतात आणले पाहिजेत. त्यांच्यावर खटले चालले पाहिजेत आणि त्यांना शिक्षा झाली पाहिजे, असे समस्त भारतीयांना वाटते. या गुन्हेगारांना त्यांच्या कृत्यांचे परिणाम भोगावे लागतील याची खात्री करण्यासाठी सतत आंतरराष्ट्रीय सहकार्य, मजबूत कायदेशीर रणनीती आणि दृढ राजकीय इच्छाशक्ती भारताने आतापर्यंत दाखविली आहे. ती यापुढेही तशीच दर्शविली पाहिजे.

यासंदर्भात एक समजून घेतले पाहिजे आणि ते असे की, सामान्य माणसे या अशा गुन्हेगारांकडे आणि त्यांनी केलेल्या गुन्ह्यांकडे फार वेगळ्या नजरेने पाहतात. त्यांना असे वाटते की, बँकेच्या छोट्याशा कर्जाचा एक हप्ता टळला किंवा चुकला तर बँकेचे लोक सामान्य माणसांच्या दारात येऊन उभे होतात. फोनवर फोन करून सतावतात... आणि दहा, वीस, तीस हजार कोटी रुपयांचे घपले करून अशा मुखंडांना अटक होत नाही, त्यांच्यावर कारवाईही होत नाही. ते परदेशात पळून जातात आणि सुखेनैव राहतात. न्याय सर्वांसाठी सारखा आहे, असे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात तसे दिसत नाही, असे सामान्यांना वाटते ते उगाच नाही. अगदी न्यायपालिकेच्या संदर्भात सुद्धा सामान्यांच्या मनात फार चांगली भावना नाही. हे असे वातावरण निर्माण होण्याचे कारण म्हणजे गतकाळात अनेक गुन्हेगारांना मिळालेले मोकळे रान. अशा स्थितीत तहव्वूर राणा असो वा मेहुल चोक्सी असो, त्यांना कायद्याचा बडगा दाखविला जाणार आहे, याचे सामान्य भारतीयांना समाधान वाटते आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार, त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आणि केंद्रीय यंत्रणा या साऱ्यांनीच एक आशेचा भाव भारतीयांच्या मनात निर्माण केलेला आहे. ही आशा निराशेत परिवर्तित होऊ नये, याची काळजी सर्व तपास यंत्रणांनी घेतली पाहिजे. मेहुल चोक्सीने कोणत्या तरी दुर्धर आजाराचे कारण दाखविल्याची व त्यावर उपचार सुरू असल्याची माहिती दिल्याचीही खबर आलेली आहे. आजार असेलही. परंतु, तेवढ्यासाठी अशा गुन्हेगारांना दयामाया दाखविण्याचे कारण नाही. एका माणसाच्या जीवनाहून या देशाची पत मोठी आहे. राष्ट्राच्या सीमांवर जे सैनिक काम करतात, कारखान्यांच्या मशीन्सवर जे कामगार रात्रंदिवस राबतात, त्यातून देश सुरक्षित आणि समृद्ध होतो. अशा देशातल्या बँकिंग व्यवस्थेला टोपी लावून एखादी व्यक्ती फरार होते, याचा अर्थ कुणी ना कुणी त्यांना देशातही साथ देणारे होते. पंजाब नॅशनल बँकेचा घोटाळाही तिथल्या काही कर्मचाऱ्यांच्या संगनमतानेच झाला, हे आपल्याला विसरता येत नाही. त्यामुळे अशा सर्व झारीतल्या शुक्राचार्यांनाही शोधले आणि ठेचले पाहिजे. शेवटी हा प्रश्न केवळ १३ हजार कोटींचा नाही. तो केवळ पंजाब नॅशनल बँक या एका बँकेपुरताही मर्यादित नाही. तो राष्ट्राच्या इभ्रतीचा आणि सामान्यांच्या आकांक्षांचा, अपेक्षांचा प्रश्न आहे.

## विशेष

# पायाभूत सुविधा बदलेल भारताचे चित्र

प्रा. सुखदेव बखळे

भारतात गेल्या दहा वर्षांमध्ये पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. २०१४ मध्ये ९१ हजार २८७ किलोमीटर असलेले रस्त्यांचे जाळे २०२४ पर्यंत एक लाख ४६ हजार १९५ किलोमीटरपर्यंत म्हणजेच सुमारे ६० टक्क्यांनी विस्तारले आहे. त्यामुळे कार्गो वाहतूक कार्यक्षमता आणि प्रादेशिक कनेक्टिव्हिटी सुधारली आहे. भारतीय रेल्वेने ६४ हजार ४२१ किलोमीटर लोहमार्ग ब्रॉड-गेज नेटवर्कचे विद्युतीकरण केले आहे. त्यामुळे लॉजिस्टिक खर्चात लक्षणीय घट होईल आणि शाश्वत वाहतुकीला प्रोत्साहन मिळेल. दरम्यान, मेट्रो रेल्वे नेटवर्क २०१४ मधील २४८ किलोमीटरवरून २०२४ मध्ये ९४५ किलोमीटरपर्यंत वाढले. त्यामुळे शहरी गतिशीलता बदलेल आणि प्रमुख शहरांमधील गर्दी कमी होईल. भारताचे विमान वाहतूक क्षेत्रदेखील वेगाने वाढत आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात आपली भूमिका मजबूत करीत आहे. उडान योजनेंतर्गत ६१९ मार्ग कार्यान्वित केले गेले आहेत. त्यामुळे १.५ कोटी प्रवाशांना फायदा झाला असून, पूर्वीच्या कमी असलेल्या प्रदेशांमध्ये हवाई प्रवास अधिक सुलभ झाला आहे. २०१४ मध्ये कार्यरत विमानतळांची संख्या ७४ वरून १५९ पर्यंत वाढली आहे. पुढील पाच वर्षांमध्ये ५० नवीन विमानतळ उभारण्याची योजना आहे. प्रादेशिक संपर्क वाढवण्यासाठी आणि जागतिक व्यापारातील प्रमुख खेळाडू म्हणून भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी या घडामोडी महत्त्वपूर्ण आहेत. या जलद विस्ताराला पाठिंबा देण्यासाठी आणि व्यवसाय ऑपरेशन्स सुव्यवस्थित करण्यासाठी, आधुनिक लॉजिस्टिक पार्क्स आर्थिक कार्यक्षमतेचे महत्त्वाचे सक्षमक म्हणून उदयास येत आहेत. या अत्याधुनिक सुविधा वेअरहाऊसिंग, कार्गो हाताळणी आणि 'मल्टिमोडल ट्रान्सपोर्टेशन नेटवर्क्स' एकत्रित करून पुरवठा साखळी ऑपरेशन्स वाढवण्यासाठी डिझाईन केल्या आहेत.



जागतिक व्यापार अधिक स्पर्धात्मक झाल्यामुळे लॉजिस्टिक हब आवश्यक आहेत. रणनीतिकदृष्ट्या स्थित लॉजिस्टिक पार्क्स गोदाम, वितरण आणि मूल्यवर्धित सेवांसाठी केंद्रीकृत केंद्र म्हणून काम करतात. त्यामुळे व्यवसायांना ऑपरेशन्स ऑप्टिमाईझ करता येतात आणि खर्च कमी होतो. त्यांची भूमिका विशेषतः उत्पादन, ई-कॉमर्स, फार्मास्युटिकल्स आणि कृषी यासारख्या उद्योगांसाठी महत्त्वपूर्ण आहे. तिथे कार्यक्षम मालवाहतूक आणि 'कोल्ड चेन लॉजिस्टिक्स' वेग, गुणवत्ता आणि खर्चबचत सुनिश्चित करतात. निर्यात-आयात समुदायासाठी, लॉजिस्टिक पार्क जलद सीमाशुल्क मंजुरी, विलंब कमी करणे आणि शिपमेंट टाईमलाईन सुधारणे सुलभ करतात. ई-कॉमर्स आणि किरकोळ उद्योगांना अखंड इन्व्हेंटरी वितरण आणि सुधारित शेवटच्या-माईल कनेक्टिव्हिटीचा फायदा होतो. त्यामुळे ऑर्डरची जलद पूर्तता होते. त्याचप्रमाणे, कृषी आणि नाशवंत उद्योगांना एकात्मिक 'कोल्ड चेन सोल्युशन्स'चा फायदा होतो. ते उत्पादनाची गुणवत्ता राखतात आणि काढणीनंतरचे नुकसान कमी करतात. आधुनिक लॉजिस्टिक पार्कचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे मल्टिमोडल वाहतूक पायाभूत सुविधांशी एकीकरण. 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' (डीएफसी) पूर्ण ऑपरेशनल क्षमतेच्या जवळ आल्याने, कार्गो ट्रान्झिट वेळ पन्नास टक्क्यांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे, तर लॉजिस्टिक खर्च ३० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. हे ऑप्टिमाईझ्ड हवाई, रेल्वे, रस्ते आणि समुद्र कनेक्टिव्हिटीद्वारे जलद, किफायतशीर मालवाहतूक सुनिश्चित करते. याव्यतिरिक्त, सागरमाला उपक्रम बंदर आधुनिकीकरण आणि किनारी पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रित करतो. तो आयात-निर्यात लॉजिस्टीक कार्यक्षमता वाढवून भारताची जागतिक व्यापार क्षमता मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. भारताचा सध्याचा लॉजिस्टिक खर्च जीडीपीच्या १४ टक्के आहे. तो जागतिक मापदंड (चीन आठ टक्के, अमेरिका नऊ टक्के) पेक्षा लक्षणीय आहे. 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी' (एनएलपी) चे २०३० पर्यंत ही तफावत आठ टक्क्यांपर्यंत भरून काढण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनतील. भारताने पायाभूत सुविधांची भरभराट सुरू ठेवल्याने लॉजिस्टिक पार्क्स त्याच्या विमान वाहतूक आणि पुरवठा साखळी नेटवर्कचा कणा बनतील. या सुविधा ऑपरेशनल कार्यक्षमता वाढवण्यासाठी, व्यवसायातील स्पर्धात्मकता सुधारण्यासाठी आणि आर्थिक वाढीस समर्थन देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यास तयार आहेत.

भारताच्या पायाभूत सुविधांच्या लॅण्डस्केपमध्ये गेल्या दशकात परिवर्तनात्मक बदल घडून आले आहेत. त्याने अभूतपूर्व आर्थिक वाढ आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा पाया रचला आहे. देशाने पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कनेक्टिव्हिटी, लॉजिस्टिक आणि वाहतूक कार्यक्षमतेत लक्षणीय प्रगती केली आहे. भारतीय लॉजिस्टिक उद्योगातील एक महत्त्वपूर्ण विकास म्हणजे 'युनिफाईड लॉजिस्टिक इंटरफेस प्लॅटफॉर्म' (यूएलआयपी) ची ओळख. हे मंत्रालये, प्रशासकीय संस्था आणि खाजगी संस्थांना समाकलित करते. गुंतलेल्या प्रत्येकाला रिअल-टाईम माहिती प्रदान करते. ऑपरेशन्स सुलभ करणे आणि निर्णय प्रक्रियेला गती देणे, खर्च कमी करणे आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील कार्यक्षमता सुधारणे हे त्याचे उद्दिट आहे. तंत्रज्ञान आणि वापरकर्ता-अनुकूल वैशिष्ट्ये एकत्रित करून, 'यूएलआयपी' लॉजिस्टिक्स क्षेत्र संपूर्ण नवीन स्तरावर नेण्यासाठी सज्ज आहे. ही प्रत्येकासाठी विजयाची स्थिती असून भारत अधिक कार्यक्षम आणि किफायतशीर लॉजिस्टिक प्रणालीसाठी मार्ग मोकळा करत आहे. कोविड-१९ साथीच्या आजारामुळे गंभीर समस्या उद्भवूनही भारतीय लॉजिस्टिक उद्योगाने अविश्वसनीय लवचीकता दर्शवली आहे. या उद्योगात १४.८ टक्क्यांच्या वार्षिक वाढ दराने २०२२ मधील २३० अब्ज डॉलरवरून २०२६ पर्यंत जवळपास चारशे अब्ज डॉलरपर्यंत वाढ होण्याची अपेक्षा आहे. पायाभूत सुविधा सुधारण्यावर आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर सरकारचे लक्ष असल्यामुळे हे शक्य होईल.

'एमएमएलपी', आर्थिक रेल्वे कॉरिडॉर आणि 'यूएलआयपी'सारखे उपक्रम हे योग्य दिशेने टाकलेली पावले आहेत; परंतु शाश्वत वाढीसाठी शाश्वत गुंतवणूक आणि धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. लॉजिस्टिकमध्ये आपली पूर्ण क्षमता वापरून भारत जागतिक पुरवठा साखळी परिसंस्थेमध्ये आपले स्थान मजबूत करू शकतो. यामुळे देशाची आर्थिक वाढ होऊन रोजगाराच्या संधी आणि स्पर्धात्मकता वाढेल. लॉजिस्टिक क्षेत्रातील भारत सरकारच्या गुंतवणुकीमुळे परिस्थिती बदलत असून अधिक कार्यक्षम आणि किफायतशीर बनत आहे. 'मल्टी-मोडल लॉजिस्टिक पार्क', 'इकॉनॉमिक रेल्वे कॉरिडॉर' आणि 'युनिफाईड लॉजिस्टिक इंटरफेस प्लॅटफॉर्म' यासारख्या उपक्रमांद्वारे भारत आधीच जागतिक लॉजिस्टिक हब बनण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. भारताच्या लॉजिस्टिक उद्योगाचे भविष्य उज्ज्वल दिसत आहे. नावीन्यपूर्ण, धोरणात्मक गुंतवणुकीचे प्रयत्न, सतत प्रगती आणि संपत्ती निर्मितीसाठी शाश्वत वाढीला चालना देणारी नवीन धोरणे सरकारने आखली, तर या उद्योगाला निश्चितच उज्ज्वल भवितव्य आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# 'हिट' स्टेशन; कर्तेकरविते आम्हीच!

निसर्गाने आम्हाला खूप काही दिले; पण आम्ही काय दिले, असा प्रश्न स्वतःला विचारला तर समाधानकारक उत्तर मिळणे कठीण आहे. कारण जे निसर्गाचे होते, तेही आम्ही आमच्या कृतीने हिरावून घेतले. म्हणूनच आता आमचे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे हिल स्टेशन आता 'हिट' स्टेशन झाले आहेत. हिल स्टेशनवरील वाढलेले तापमान आमच्याच कृपाप्रसादाचे फळ आहे, हे थंड हवेच्या ठिकाणी जाऊन आज उकाड्याची अनुभूती घेणाऱ्यांनी ध्यानी ठेवावे.

महाराष्ट्राकडे पर्यटनाची पंढरी म्हणून पाहिले तरी काहीच कमी नाही, असा महाराष्ट्र आहे. निसर्गाने मुक्तहस्ते निसर्गाची उधळण महाराष्ट्रावर केली असल्याने पर्यटन स्थळांची येथे रेलचेल आहे. आज महाराष्ट्रातील पर्यटने जी थंडे हवेची ठिकाणे म्हणून ओळखली जातात, ती कायम पर्यटकांनी गजबजली असतात. उकाड्याच्या दिवसांमध्ये तर या गर्दीला ऊत येतो. आज चित्र मात्र वेगळे आहे. थंड हवेची ही ठिकाणे 'हिट' स्टेशन झाली आहेत आणि याचे कर्तेकरविते आम्हीच आहोत.

महाबळेश्वर, माथेरान, पाचगणी, लोणावळा, चिखलदरा, तोरणमाळ अशी उंच आणि थंड हवेची ठिकाणे देशभर हिल स्टेशन म्हणून ओळखली जातात. परदेशी पर्यटकही या ठिकाणांच्या प्रेमात पडतात. खरं तर थंड हवेच्या ठिकाणांचे कमाल तापमान ३० अंशापर्यंत असणे अपेक्षित आहे. परंतु आज बहुतांश थंड हवेच्या ठिकाणी ४० अंशापर्यंत तापमानाची नोंद होत आहे आणि ही धोक्याची घंटा आहे. महाबळेश्वर ३३ अंशावर, माथेरान ३४, तोरणमाळ, इगतपुरी ३९ अंशावर जाऊन पोहोचल्याने हिल स्टेशनच्या ठिकाणी थंडाव्याऐवजी उष्णतेच्या 'आनंदा'त पर्यटकांना राहावे लागत आहे. कधी काळी उन्हाळ्यातही आपले महत्त्व टिकवून ठेवणारी ही थंड हवेची ठिकाणे आज का बदलली, तापमान का वाढले याचा विचार केल्यास त्याचा दोष आपल्या उरी आल्याशिवाय राहणार नाही. जागतिक तापमानात झालेली वाढ हे याचे कारण सांगितले जाते. मग याचे वाटेकरी आपणच आहोत ना? एकीकडे थंड हवेच्या ठिकाणी जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालविण्याची इच्छा बाळगायची आणि दुसरीकडे झाडांची कत्तल करायची. झाड लावण्याची जबाबदारी माझी नाही, या मानसिकतेत वावरायचे. झाडे कापली गेल्याने जमिनीचे वाढलेले तापमान थंड हवेची ठिकाणं गरम करण्यासाठी कारणीभूत ठरली आहेत. अशा ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे प्रचंड प्रमाणात झालेले काम, हिल स्टेशनवर वाढलेला वाहनांचा वापर अशा ठिकाणांचे महत्त्व संपविण्यासाठी पुरेसे आहे. आम्ही निसर्गाकडून अपेक्षा करतो, पण खरंच निसर्गाला काही देतो का? याचा विचार करण्याइतपत कुणीच प्रगल्भ दिसत नाही. निसर्गाचे जे आहे, ते आपलेच आहे. या आविर्भावात आहे ते ओरबाडण्याची आमची मानसिकता असल्याने आज निसर्गाचे चक्र बदलत चालले आहे. जागतिक स्तरावर झालेली तापमानातील वाढ आमच्याच वागणुकीचा परिपाक आहे. प्लॅस्टिकचा प्रचंड वापर, शहरीकरणाच्या नादात मातीच्या घरांचे सिमेंटच्या घरात झालेले रूपांतर, घरातील अंगण नाहीसे होऊन त्या ठिकाणी आलेले सिमेंटचे अंगण यापेक्षा दुसरे काय देऊ शकेल?

भूगर्भातील जलसाठा संपण्याच्या मार्गावर आहे. जमिनीला असंख्य छिद्र पाडून आम्ही तिच्या आतील पाणी उपसण्याचा प्रयत्न करतो. आज भूगर्भातील पाणी आटल्याने जमीन तापू लागली आहे, पण आमचा स्वार्थ संपण्याचे नाव घेत नाही. पाणी जमिनीत मुरावे म्हणून जलपुनर्भरण करण्याचे शहाणपण आम्हाला सुचत नाही. अशा सर्व निसर्गविरोधी कृती करून शेवटी आम्ही मनाला आणि जीवाला शांतता मिळावी म्हणून थंड हवेच्या ठिकाणी जात असू तर खरंच, निसर्ग तुमच्या मदतीला कितपत धावून येईल, हा प्रश्नच आहे.

आज थंड हवेचे ठिकाण असो वा निसर्गाचे बदललेले इतरही रूप याचे पातक नक्कीच आपल्या माथी लिहिले जाणार आहे. निसर्गाला ओरबाडून स्वतःचा स्वार्थ साधून घेणारे आम्ही, निसर्गाप्रति आपले असलेले कर्तव्य विसरलो आहोत. त्यालाही आपल्याकडून काही अपेक्षा असेल, याचे भान आम्हाला राहिलेले नाही. म्हणून तर पर्यटनासाठी जाऊन त्याच ठिकाणी प्लॅस्टिकचा खच उभे करणाऱ्या आम्हाला आमचे मन जराही खात नाही. आज हिल स्टेशनचे तापमान वाढले याची जाणीव झाली; कारण त्या ठिकाणाकडून तुम्हाला थंड राहण्याचीच अपेक्षा आहे. मग तुमच्याकडून निसर्गाला असलेल्या अपेक्षांचे काय? जर निसर्गाप्रति तुम्ही तुमचे कर्तव्य पार पाडू शकत नसाल तर मग निसर्ग स्वार्थी झाला तर हरकत काय?

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# भल्या माणसा, देवाला सारं कळतंय रे...!

प्रा. दिलीप जोशी

माणसे उजेडात तर चांगलीच वागतात, पण हीच माणसे अंधारात कशी वागतात? यालाच त्याचे चारित्र्य म्हणतात. भारतीय संस्कृतीत चारित्र्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे, नव्हे चारित्र्य जपण्यासाठीच भारतीय माणूस कायम सजग असतो. कुठलाही डाग आपल्या अंगावर पडू नये यासाठी आपण खूप काळजी घेत असतो. सर्व महापुरुषांनी आपल्याला हाच उपदेश दिला आह;- 'शीलं परम् भूषणम्', 'प्रज्ञा शील करुणा', 'ज्ञान चारित्र्य एकता' अशी अनेक ब्रीदवाक्ये आपण नेहमीच ऐकतो. भगवान श्रीराम, भगवान तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह सर्व महापुरुषांच्या जीवनात चारित्र्याला अग्रक्रम दिला आहे. त्यांच्या जीवनाचा पायाच चारित्र्य आहे. थोडक्यात चारित्र्यसंपन्न माणूस हा भारतीय संस्कृतीचा प्राण आहे.

आताचा विचार केला तर खरंच आपण चारित्र्य हा विषय गांभीर्याने घेतो का? आपण आयुष्यभर अस्सल चारित्र्यसंपन्न असावे हा विचार तरी आपल्या डोक्यात असतो का? तसे संस्कार होतात का? या सर्व प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे देताना नन्नाचा पाढाच म्हणावा लागेल. प्रकाशात सर्वच जण राजा हरिश्चंद्र असल्याचा आव आणतात; प्रत्यक्षात चित्र वेगळेच असते. पकडले गेले नाही म्हणून धर्मराज आणि चारित्र्यवान, पण सीसीटीव्हीत कैद झाले तर दुर्योधनच अशी स्थिती आहे. म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी चारित्र्याची चपखल व्याख्या केली आहे-

charector is what you are in dark!

तुम्ही अंधारात कसे वागता याला तुमचे मूळ चारित्र्य म्हणतात. उजेडात तर सर्वच चांगले असल्याचा आव आणतात, पण हीच माणसे अंधारात कशी वागतात हे जर समजले तर चांगूलपणावरचा विश्वास उडेल आपला.

इतक्यात खूप प्रकरणे बाहेर येताहेत. ती माणसे उजेडात खूपच आदरणीय आणि सज्जन होती, पण त्यांच्या चित्रफिती पाहिल्यावर सिसारी येते. कुणी न्यायालयात प्रतिज्ञापत्र देतात की मुले माझी, पण पत्नी माझी नाही. कुणी भ्रष्टाचाराचे कर्दनकाळ म्हणवतात आणि त्यांचे किळसवाणे, अश्लील व्हिडीओ पाहताच लाज वाटते. कुण्या नेत्यावर नग्न फोटो पाठविल्याचा आरोप तर कुणाचे सनदी अधिकाऱ्याशी संबंध, कुणी नटीच्या खुनात सहभागी तर कुणी विदेशात अय्याशी करताना पकडले गेले. कुणी भर मिरवणुकीत आगाऊ वागले तर कुणी मंचावरच कामातुर. अंधारात केवळ नेते किंवा अभिनेते नाहीत तर मुल्ला मौलवी, छद्म साधूही वेशीवर टांगले गेले. हे तर त्यांचे नशीब खराब म्हणून ते पकडले गेले. पकडले न गेलेले अनेक असतील जे उजेडात एक अन् अंधारात व्यस्त आणि विपरीत आहेत.

चारित्र्य म्हणजे कामातुर, भ्रष्टाचार एवढा मर्यादित नाही. सर्वसामान्य माणूसही अंधारात योग्य वागतो का? याचे उत्तरही नाहीतच येईल.

सार्वजनिक संपत्तीकडे दुर्लक्ष, नळाला तोटी नसणे, नळाचे पाणी धो धो वाहू देणे, विजेचा अपव्यय, कचरा इतरत्र फेकणे या सर्व गोष्टी आपण अंधारातच आणि बेजबाबदारपणे करतो. आपल्या दारासमोरचा कचरा शेजाऱ्याच्या दारात चोरून लोटणे, आपल्या घरातले उंदीर पिंजऱ्यात पकडून दुसऱ्या गल्लीत सोडून देणे, अशा छोट्या छोट्या अनेक गोष्टी आपण चोरून करतो. हेसुद्धा चारित्र्यहीनतेचे लक्षण आहे. रस्त्याने जाताना पोलिस असले तर शिस्तीचे प्रदर्शन, पण तेच त्यांच्या माघारी खुशाल नियम तोडणे, चालत्या गाडीतून रस्त्यावर पाणी बॉटल किंवा केळाची सालं, कचरा फेकणे, थुंकणे, प्लॅस्टिक पिशव्या चोरून वापरणे हेही चारित्र्यहीनतेचे लक्षण आहे. या बाबी आपण गुपचूप म्हणजे अंधारातच करतो. थोडक्यात कुणाचे लक्ष नसल्यास, अंधारात आपण विघातक वागत असतो.

उजेडात तर सर्वच चांगले वागतात. तो त्यांचा छद्म चेहरा किंवा मुखवटा असतो, पण एकांतात हा मुखवटा स्वतःच्याच हाताने फाडतो आणि भ्रष्ट वागतो. एक लक्षात ठेवा, अंधारात तुम्हाला कुणी पाहत नाही असे वाटत असेल तर ती तुमची घोडचूक आहे. तो सर्वव्यापक परब्रह्म परमात्मा तुमच्यावर लक्ष ठेवून आहे. त्याचा सीसीटीव्ही कॅमेरा अचूक टिपतो तुमची कृत्ये आणि गैरकृत्येही. सध्या काही लोकांची सर्वत्र चर्चा चवीने चघळली जात आहे. जे पकडले गेले ते इतके दिग्गज आहेत की, त्यांच्याकडून चूक होणे शक्यच नाही हा आपला विश्वास, पण कालचक्र असे फिरले की, ते दिगंबर झाले. उजेडात एक आणि अंधारात एक असे का म्हणून वागावे? पण सहज वागतो आपण! हे सर्व संस्काराच्या अभावाने होते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षणावर जोर दिला आहे. मेकॉलेच्या पिलावळींनी संस्कारच नष्ट केले. केवळ पोट आणि पोटाखालचा भाग यावरच लक्ष केंद्रित केले. त्यामुळे त्यागी प्रवृत्ती नष्ट झाली आणि भोगी विचार ठासून भरला. चंगळवाद आणि ऐशोआरामाला प्राथमिकता आली. त्यामुळे उजेडात स्वच्छ दिसणारा माणूस अंधारात खूपच गलिच्छ आणि घाणेरडा असल्याचे दिसते. नीतिमत्ता, धर्म, देव, देश यांना स्थानच नाही. म्हणूनच स्वतःला देशभक्त म्हणविणारा एका स्त्रीच्या नादाला लागून देशाची गुपिते पाकिस्तानला देण्याचे धाडस करतो. कुणी विदेशात जाऊन भारताची निंदानालस्ती करतो. हा चारित्र्यहीन आणि देशद्रोहीपणा आहे. विजय माल्या, नीरव मोदी यांनी अंधारात केलेले घोटाळे उघड झाल्यावर त्यांचे वस्त्रहरण झाले. तोपर्यंत ही माणसे लाल पायघड्यावर असायची. ही माणसे चारित्र्यहीनच.

अर्थ आणि काम या पुरुषार्थाकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष होते. कामचक्र तर सर्वांचेच जागृत आहेत. प्रत्येकाच्या नजरेत कामदेव कायम निवासी. भोगवासना प्रत्येकाच्या आत ठासून भरलेली. वर वर स्वच्छ दिसणारी पण आतून नैतिक अध:पतन झालेली असतात. यावर एकच इलाज तो म्हणजे भारतीय नैतिक आणि आध्यात्मिक शिक्षण. याशिवाय कुटुंब प्रबोधन झाले पाहिजे. पूर्वीप्रमाणे घरातून संस्कार झाले पाहिजेत. ध्यानधारणा, उपासना थोडीफार तरी हवीच हवी. आपल्यावर त्या सावळ्या परब्रह्माची कायम नजर आहे हे मनावर ठसले तर उजेडात तर स्वच्छ वागतोच, पण अंधारातही नीतिमत्ता कायम ठेवून सर्व वागतील. यालाच चारित्र्यसंपन्न मनुष्य निर्माणाची प्रक्रिया म्हणतात. पकडले गेले म्हणून चोर ही स्थिती योग्य नाही. म्हणूनच तुम्ही अंधारात कसे वागता त्याला चारित्र्य म्हणतात. लक्षात ठेवा, अंधारात इतरांचे लक्ष नसेलही, पण तो पांडुरंग लक्ष ठेवून आहे, अंधार असो किंवा उजेड!

'पाप करूनी, पापी मन हे, सैरावैरा पळतंय रे ।
काय काय केलंस, भल्या माणसा, देवाला सारं कळतंय रे...!'

९८२२२६२७३५

### चैत्र सृजनोत्सव

चैत्र महिन्यात वसंत ऋतूची सुरुवात होते. नवीन शकसंवत्सर हे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच गुढी पाडव्याच्या दिवशी सुरू होते. उष्णतेला सुरुवात झाली आहे. उन्हाच्या झळा जाणवत असताना गुलमोहर, बहावा हे वृक्ष फुलून आले आहेत आणि लाल, पिवळ्या रंगाची उधळण सर्वत्र करीत आहेत. फळांचा राजा आंबा याच काळात मोहरतो, फळतो आणि सगळ्यांची रसना तृप्त करायला सज्ज होतो. मोगऱ्याचा सुगंध, आंब्याची डाळ, पन्हे हा सारा थाट वसंताची वर्दी देतो. खरंतर चैत्र महिना म्हणजे कडक ऊन. पण चैत्राचे ऊन म्हणजे फक्त झळा असे नाही तर त्यात सृजनशीलता असते. झाडांना पल्लवित करणारी आणि फळांना गोडवा देणारी आहे. रामाचे नवरात्र, हनुमान जन्मोत्सव, गौरीचे नवरात्र याच दिवसात असते.



गौरीला गोड, खाऱ्या पदार्थांचा नैवेद्य, उन्हाळी फळांची रेलचेल, फुलांची आरास, याच हळदीकुंकवाला केली जाते. वाळ्याचे पाणी पिण्याची मजा काही औरच. त्यामुळे या महिन्याला महोत्सवी स्वरूप येते. पर्यटनासाठी गाड्यांना तोबा गर्दी याच दिवसात बघायला मिळते. त्यामुळे चैत्र उदय म्हणजे साऱ्यांनाच नवी उमेद देणारा असतो. उत्साहातून फुलत जाणारे उत्सव समारंभ आणि नवलाई ल्यालेली पालवीची झाडे असा एकूणच सृष्टीचा सृजनोत्सव असतो. मग आपण का बरे निरुत्साही आणि उन्हाचा बाऊ करणारे व्हावे. योग्य काळजी घेऊन आपणही या सृजनोत्सवाचे स्वागत करण्यास सज्ज होऊया.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

●● ●●

### मंगेशकर कुटुंबाबद्दल बोलताना विचार करावा


लता मंगेशकर कुटुंबीयांबद्दल कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी खूपच चुकीचे आणि अपमानस्पद विधान केले. आजकाल कोणतेही राजकीय नेते कोणाबद्दल विधान करून स्वतःला टीव्ही अणि बातम्यांमध्ये आपण कसे चर्चेत येऊ ही जणू फॅशन झाली आहे. लतादीदींच्या कुटुंबीयांचे संगीत क्षेत्रात किती मोठे योगदान आहे, हे सर्वांना माहीत आहे. ज्या मंगेशकर कुटुंबाला भारतरत्न, पद्मविभूषण, महाराष्ट्र गौरव व अन्य कितीतरी पुरस्कार देऊन सन्मानित केले, अशा कुटुंबाचा अपमान करण्याचा अधिकार कोणी दिला? ज्या कॉंग्रेसच्या नेत्यांनी मंगेशकर कुटुंबाबद्दल असे वक्तव्य केले त्यांनी देशाकरिता काय केले? तुम्ही स्वतः निवडणुकीत उभे झाले. निवडणुकीत उभे राहून तुम्ही आमदार बनले, किती गरिबांना तुम्ही मदत करून उच्च शिक्षण दिलं, किती लोकांचं भलं केलं हे सांगा. आपण प्रतिष्ठित नेते आहोत याचा विचार करून बोलावे. आज लता मंगेशकर यांना देश लतादीदी म्हणजे देशाची बहीण मानते. अशा प्रतिष्ठित कुटुंबाचा अपमान करणे योग्य नाही.

**शिरीष पटवर्धन**/९४२२११००१५

## वाचक पत्रे

### केंद्र सरकारचा स्तुत्य निर्णय

भारत म्हणायला फक्त सर्वधर्मसमभाव असणारा देश आहे. परंतु मागील ७० वर्षांत असे काही कायदे सरकारने काढले, ज्यात बऱ्याच लोकांवर अन्याय तर मूठभर लोकांचा खूप फायदा करणारे कायदे होते. परंतु आताच्या भारत सरकारने या कायद्यात बरेच बदल केले, काही अनावश्यक कायदे रहित केले. २ एप्रिल रोजी बहुसंख्यक मतांनी वक्फ बोर्ड संशोधन कायदा पारित झाला. २०१३ मध्ये तत्कालीन केंद्र सरकारने वक्फ बोर्डाला वक्फ कायद्याच्या माध्यमातून खूप मजबूत बनवले होते. ज्यामध्ये जिल्हाधिकारी असू दे, जिल्हा न्यायालय, हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट, सरकार, प्रशासन इत्यादींचा हस्तक्षेपसुद्धा अमान्य केला जात होता. म्हणजे इतरांच्या जमिनी बळकावण्याचा अधिकार काही मूठभर लोकांच्या हाती देऊन तत्कालीन सरकारला काय साध्य करायचे होते, ते न कळणारे आहे. परंतु करोडोंच्या घरात हा कायदा रहित व्हावा किंवा या कायद्यात अपेक्षित सुधारणा व्हावी, याकरिता भारतीय जनतेने जेव्हा याचिका दाखल केली तेव्हा सरकारने त्याची नोंद घेऊन त्यात आवश्यक सुधारणा करण्याचे ठरविले. त्याकरिता त्यांनी जनतेची मते मागविली, सगळ्यांचा सल्ला घेतला, समिती बनवली. जवळपास २० तासांवर लोकसभेत व राज्यसभेत चर्चा करून, त्यावर सुधारित कायदा बनवण्याचा निर्णय अंतिम झाला. यामुळे ज्यांच्या जमिनी लाटल्या गेल्या, त्या सर्वांचाच फायदा होणार आहे. सरकारने केलेला हा कायदा अभिनंदनास पात्र आहे. असेच बेकायदेशीर कायदे सरकारने पुढे देखील रहित करावे आणि जनतेला न्याय द्यावा, ही विनंती.





**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## नूतन विद्यालयाच्या सान्वी, तन्मय यांचे घवघवीत यश

### राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धेत सुर्वण व रौप्य पदकांचे मानकरी

**सेलू,/प्रतिनिधी :** बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४-२५ मध्ये सेलू येथील नूतन विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत इयत्ता सहावीतील सान्वी गजानन शितळे हीने सुर्वण पदक, तर तन्मय जयकिशन भुतडा याने रौप्यपदक मिळवले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.





बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने आयोजित या राज्यस्तरीय स्पर्धेत विज्ञान विषयातील गोडी निर्माण करणे व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हा उद्देश असतो. इयत्ता सहावी व नववी या दोन स्तरांवर दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या लेखी चाचणी, प्रयोगात्मक चाचणी, प्रकल्प सादरीकरण व मुलाखत या तीनही टप्प्यांत सान्वी व तन्मय या दोघांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. अंतिम फेरीत सान्वीने आपले वैज्ञानिक कौशल्य प्रभावीपणे सादर करत सुर्वण पदक मिळवले, तर तन्मय भुतडा याने उत्तम कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावे केले. या यशामागे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ हे तितकेच महत्त्वाचे ठरले आहे. शाळेच्या वतीने तसेच विविध स्तरातून सान्वी आणि तन्मय यांचे अभिनंदन होत आहे.

## जिंतूर येथे भिमजायंती निमित्त ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे यांच्या किर्तनाचे आयोजन

**जिंतूर,/प्रतिनिधी :** विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी जिंतूर शहरात साजरा होणाऱ्या उलगुलान महोत्सव निमित्त राष्ट्रीय कीर्तनकार ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे आळंदीकर यांच्या समाज प्रबोधनपर कीर्तनाचा कार्यक्रम १७ एप्रिल गुरुवार रोजी सायंकाळी सहा वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर प्रांगण, नगर परिषद जिंतूर येथे आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष ॲड. चंद्रकांत बहिरट कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. देवराव कऱ्हाळे उद्घाटक राहुल शेठ देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जिंतूर तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सामाजिक चळवळीतले प्रमुख व्यक्तिमत्व यांचा सत्कार करण्यात येणार असून जिल्हाभरातून सामाजिक चळवळीतले कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने परभणी जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय कीर्तनकार यांच्या सामाजिक कीर्तनाचा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यामुळे अनेकांना या कार्यक्रमाची उत्सुकता आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक पत्रकार रत्नदीप शेजावळे भगीरथ मिरासे आकाश तारे अशोक प्रधान प्रवीण वाकळे भास्कर सुरवसे शंकर वाघ सुखदेव वाहुळे नामदेव तूपसुंदर यांनी केले आहे.

''भिमजयंती सणाला.. माऊली किर्तनाला''

परभणी जिल्ह्याच्या आंबेडकरी गायन संस्कृतीच्या ईतिहासात भिमजयंती निमित्त प्रतिवर्षी आयोजीत करण्यात येणाऱ्या सांस्कृतीक कार्यक्रमाला भिमगीत, ऑर्केस्ट्रा, गायन सामना अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते परंतु या वर्षी मात्र जिंतूर मधील उलगुलान भिमोत्सव निमित्त वारकरी संप्रदायातील एका किर्तनकाराला आमंत्रित करण्याची बहुदा ही पहिलीच वेळ असल्याने माऊली महाराज वाबळे किर्तनातून नेमका कोणता संदेश देतील याची उत्सुकता वाढली आहे.

## ना.साकोरे यांच्या प्रयत्नातून जिंतूर आगारास पाच बसेस उपलब्ध

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ या आगारास आज जिंतूर येथे परभणी जिल्ह्याचे कार्यसम्राट व लोकप्रिय पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांच्यामुळे जिंतूर आगारास पाच नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या गेल्या अनेक दिवसापासून जिंतूर आगारास भंगार गाड्या उपलब्ध होत्या या भंगार गाड्यांमुळे अनेक प्रवाशांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत होते त्यामुळे परभणी जिल्ह्याचे लोकप्रिय तथा राज्यमंत्री कार्यसम्राट यांच्यामुळे जिंतूर आगारास पाच नवीन बसेस मिळाल्या. या पाच बसेस आज रोजी जिंतूर आगारास आल्यानंतर त्या बसेसचं प्रवासी व अनेक कार्यकर्त्यांनी स्वागत केले यावेळी जिंतूर चे माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख जिंतूर ते माजी नगराध्यक्ष सचिन भैया उर्फ मुन्ना गोरे तसेच जिंतूर चे माजी नगराध्यक्ष डॉक्टर पंडितराव दराडे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी दादा वटाणे भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थेटे अकोलीचे सरपंच रमेशजी सडाळ आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांचे सहाय्यक सचिव खेतरे आबा माजी नगरसेवक चंद्रकांत बहीरट माजी नगरसेवक विलास भंडारी पत्रकार गुणीरत्न वाकोडे बाबा जोशी आदी मान्यवर व एसटीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते पाच बसेस उपलब्ध झाल्यामुळे कर्मचारी व प्रवासी यांनी आनंद उत्सव साजरा करण्यात आला.



तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# डॉ. रोडगे यांच्या कार्याची दखल जागतिक पातळीवर अभिमानास्पद - माजी आमदार बोर्डीकर





**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:-** डॉ. संजय रोडगे यांचे कार्य शिक्षण, समाजसेवा आणि युवक विकास या क्षेत्रांमध्ये अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्याची दखल जागतिक पातळीवर घेतली जात आहे,हे अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी रविवार १३ रोजी साई नाट्यगृह येथे आयोजीत सत्कार प्रसंगी केले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, माजी आमदार विजय जाधव, सत्कारमूर्ती तथा श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. संजय रोडगे, डॉ. सविता रोडगे, स्वागताध्यक्ष गोविंद जोशी, डॉ. विनायक कोठेकर, महेश पाटील, डॉ. राम रोडगे, डॉ. अपर्वा रोडगे, बाजार समिती संचालक अनिल पवार,माऊली ताठे, प्रफुल्ल बिनायाके, अशोक पटवारी, रहीम पठाण, सुरेंद्र तोष्णीवाल, नंदु बहिवाल, आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना बोर्डीकर म्हणाले की,आपण शिक्षणाबरोबरच सामाजिक, आरोग्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय आहात. आज आपण अंतरराष्ट्रीय दर्जाचे विज्ञान भवन, जलतरण तलाव, भव्य प्रेक्षागृह व क्रीडांगण सेलू शहरात उभारण्याच्या दिशेने पुढे जात आहात हे सेलूच्या वाट्याला आलेले यश आहे..यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ.प्रताप काळे,माजी आमदार विजय जाधव,महेश पाटील,गोविंद जोशी,डॉ.विनायक कोठेकर आदींनी मनोगत व्यक्त केले. डॉ. संजय रोडगे यांनी शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेपासून केलेल्या कार्याची दाखल घेत लोकमतच्या वतीने हॉगकॉग येथे ''ग्लोबल एक्सलन्स इन एज्युकेशन'' या आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्तीबद्दल त्यांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह शाल, श्रीफळ देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमात एस्त्रो युविका अहमदाबाद येथे निवड झालेली तनिष्का तेलभरे, नासा अभ्यासक्रमासाठी निवड झालेली तेजश्री चौधरी, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये प्रथम आलेला प्रज्वल रोडगे, होमी भाभा परीक्षेत कांस्यपदक प्राप्त गौरी अबुज आदी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परीक्षांमध्ये यशस्वी ठरलेल्या परभणी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सन्मान करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन, मंथन परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, बीडीएस परीक्षा अशा विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांनाही गौरवण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ऋतुराज साडेगावकर यांनी केले. डॉ. रोडगे यांना दिलेल्या मानपत्राचे शब्दांकन डॉ. शरद ठाकर यांनी तर मानपत्र वाचन माधव गव्हाणे यांनी केले. या भव्य नागरी सत्कार कार्यक्रमात डॉक्टर्स असोसिएशन, मेडिकल असोसिएशन, व्यापारी असोसिएशन, सुवर्णकार असोसिएशन, रामा इंटरनॅशनल स्कूल (वाशिम), वकील संघ, पत्रकार संघ, पालक संघ, डॉ. संजयदादा मित्र मंडळ, रवळगाव फार्म प्रोडूसर कंपनी, तसेच ई-संघटना यांच्यातर्फे सुद्धा डॉ. संजय रोडगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वर्षा गिरी यांनी तर आभार रामराव बोबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संजय रोडगे नागरी सत्कार समितीचे अध्यक्ष डॉ. ऋतुराज साडेगावकर, रामराव बोबडे,रामराव गायकवाड, डॉ. शरद ठाकर, कृष्णा काटे,रामेश्वर शेरे,अमोल निकम, रमेश गोरे, भागवत दळवे, जयसिंग शेळके,अभिजीत राजुरकर, मनोज दीक्षित, अन्वर खान पठाण, निशिकांत पाटील, दत्तराव तांबे पूढाकार घेतला. ''ग्लोबल एक्सलन्स इन एज्युकेशन'' या आंतरराष्ट्रीय पुरस्कार मला मिळाला म्हणजे हा सन्मान माझा नसून तो सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि माझ्यासोबत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे. शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे यावर माझा ठाम विश्वास आहे. हा सन्मान मला पुढे अधिक जबाबदारीने कार्य करण्याची प्रेरणा देतो.''



## सोनपेठ ग्रामीण रुग्णालयात कर्करोग शोध मोहीम

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये बुधवार दि.१६ एप्रिल रोजी कर्करोग निदान करण्यासाठी फिरते कर्करोग शोध वाहन पथक सकाळी दाखल झाले होते. पथकातील डॉक्टरांनी विविध रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात विभागाच्या वतीने परभणी जिल्ह्यामध्ये दि.१ ते ३० एप्रिल दरम्यान कर्करोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सोनपेठ तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये दि.१ ते १५ एप्रिल या पंधरवड्यामध्ये सर्व गावातील आशा स्वयंसेवीका मार्फत स्क्रीन टेस्ट करुन सर्वे करण्यात आला होता. त्यामध्ये आढळलेल्या संशयित रुग्णांची बुधवारी येथील ग्रामीण रुग्णालयात तपासणी करण्यात आली. यावेळी मुख कर्करोगाचे २९ संशयित रुग्ण, स्तन कर्करोगाचे २३ संशयित रुग्ण, गर्भाशय मुख कर्करोगाचे ६ संशयित रुग्ण आढळून आले.त्यामधील गर्भाशयाच्या मुखाच्या संशयित दोन महिलांचे प्रयोगशाळा तपासणीसाठी नमुने घेण्यात आले.

एकुण ५८ कर्करोग संशयितांची तपासणी करण्यात आली. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाचे फिरते वाहन पथक सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले होते. या पथकामध्ये स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.अस्मिता मोरे, दंतरोग तज्ज्ञ डॉ.अमृता नागरे यांनी उपस्थित पुरुष व स्त्रियां मधील गर्भाशय, स्तन व मुखाचे कर्करोग संबंधित तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. यावेळी ५८ रुग्णांनाची तपासणी करण्यात आली. या पथकामध्ये सचिन चव्हाण,फय्युम सय्यद,किशोर नंद,सलिम भाई यांचा सहभाग होता. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विठ्ठल कराड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुभाष पवार हे उपस्थित होते.

## सेलूत डॉ.बाबासाहब आंबेडकर यांना अभिवादन

**सेलू,/प्रतिनिधी-** डॉं.बाबासाहब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त विविध सामाजिक,राजकीय संघटनांच्यावतिने अभिवादन करण्यात आले.नगरपालिका पूतळा परिसर येथे सकाळपासूनच डॉं.बाबासाहब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर,भाजपा शहराध्यक्ष अशोक अंभोरे,माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे,संजय भाग्यवंत,प्रभाकर सूरवसे,प्रा.के.डी.वाघमारे,मनिष कदम,मिलिंद सावंत,मारोती चव्हाण,गौतम धापसे,गौतम साळवे,सूबोध काकडे,विठ्ठल कोकर,दिपक धापसे,राहूल जाधव ,विकास धापसे,रोहन आकात, आदींची उपस्थिती होती .सकाळी ११ वजता समाज बांधवांच्या वतिने सामूहीक बूद्ध वंदना घेत डॉं.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी मोठ्या प्रमाणावर आंबेडकरी नागरीकांची उपस्थीती होती .



## पूर्णेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** पूर्णेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी पूर्णा,प्रतिनिधी- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.पांढरे शुभ्र वस्त्र,हातात निळे ध्वज,वाद्यांचा निनाद.. तर जयभीम च्या जयघोषात मग्न झालेली तरुणाई अश्या उत्साहपूर्ण वातावरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने सोमवारी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पारंपारिक वाद्यासह मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणूकीत पंचशील नाट्यगृह व रमाई ग्रुपच्या वतीने लेझीम पथक ,प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले.

मिरवणुकीत अबाल वृद्ध,तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. आंबेडकर नगर येथून सुरुवात होऊन सिद्धार्थ नगर ,अमोल कॉर्नर ,रेल्वे कॉलनी, भीमनगर ,महादेव मंदिर सराफा बाजार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा(शिवतीर्थ ), येथे मिरवणूक दाखल झाली.डॉ.आंबेडकर नगर पासून मिरवणुकीच्या मार्गाने ठीक ठिकाणी रसना,पाणी वाटप करण्यात आले. जयंती मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .तर महात्मा बसवेश्वर चौक येथेही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सायंकाळीं आठ च्या सुमारास मिरवणुकीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समारोप झाला.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचवणार- जिल्हाधिकारी गुप्ता

## शिक्षण, आरोग्य, शेती, वीजेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचासोबतच शिक्षण, आरोग्य, शेती, पाणीपुरवठा आणि सुरळीत वीज पुरवठा या बाबींवर मी लक्ष केंद्रीत करणार असल्याचा मानस नूतन जिल्हाधिकारी यांनी पहिल्याच दिवशी पदभार स्विकारल्यानंतर पत्रकार परिषदेत माहीती देतांना व्यक्त केला.

हिंगोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदाचा पदभार बुधवार दि १६ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी स्विकारला. पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सर्व यंत्रणांची आढावा बैठक घेत त्यांना प्रत्येक विभागाने समन्वयाने काम करीत शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधतांना ते म्हणाले की, शासकीय योजनांचा लाभ गावपातळीवर गरजुंना मिळाला पाहीजे याकडे विशेष लक्ष देणार आहे. धाराशिव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करतांना गावपातळीवर काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे ग्रामीण जनतेचे प्रश्न लक्षात आले आहेत. आता जिल्हाधिकारी म्हणून काम करतांना शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून त्याचा गावपातळीवर गरजूंना लाभ दिल्या जाणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून काम केली जातील. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्याची गुणवत्ता वाढावी यासाठी ३, ५, ७, ९ यीच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप सारख्या स्पर्धात्मक परीक्षांचे आयोजन करून लर्निंग आऊटकमवर भर दिल्या जाणार आहे. यासाठी डिजिटल स्कुल बनविण्यावर भर दिल्या जाणार असून खाजगी शाळांप्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी भौतिक सुविधा पुरवल्या जाणार आहेत.

आरोग्य संस्थांच्या माध्यमातून सर्व रूग्णांना आरोग्य संस्थेमध्ये तातडीचे औषधोपचार आणि सुविधा मिळवून देण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यात हळद आणि सोयाबीन ही प्रमुख पिके असल्यामुळे हळद प्रक्रिया उद्योगावर भर दिला जाणार आहे. महिला बचत गटांना बँकामार्फत कर्ज उपलब्ध करून देत त्यांना शेतीपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत केली जाणार आहे. एक जिल्हा, एक प्रॉडक्ट यानुसार हळदीच्या पीक उत्पादनाकडे लक्ष दिले जाणार आहे. त्यासाठी सिंचन व्यवस्था सुरळीत करण्यावर भर राहणार आहे.

जिल्ह्यात वीजेचा प्रश्न गंभीर असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आगामी काळात घरगुती, शेती व औद्योगिक क्षेत्राला वीज पुरवठा करणारे स्वतंत्र फिडर बसविण्यात येतील. त्यामुळे योग्य दाबाने आणि सुरळीत वीजपुरवठा होण्यास मदत होणार आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी हाती घेतलेल्या संजीवनी प्रकल्पाचे कामकाज सुरू ठेवले जाणार असून कर्करोग संशयित महिलांची तातडीने आरोग्य तपासणी केली जाणार असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारींसाठी व्हॉटसअॅप ग्रुप तयार केला जाणार आहे. या ग्रुपवर आलेल्या तक्रारींची शहानिशा करून त्या तातडीने सोडविण्यावर भर दिला जाणार असल्याचेही गुप्ता यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील १०१ ग्रामपंचायतीत आपले सेवा केंद्र सुरू करणार

## मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

जिल्ह्यातील १०१ ग्रामपंचायतीमध्ये आदर्श आपले सेवा केंद्र सुरू करणार असून त्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. आदर्श केंद्राचा क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर नागरिकांना आपापल्या गावातील सर्व विभागांचे आवश्यक प्रमाणपत्र मिळवता येणार आहेत. त्यामुळे घरपोच प्रमाणपत्र मिळवणे शक्य होणार आहे, अशी माहीती मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिली आहे.

हिंगोली जिल्ह्यात ५६३ ग्रामपंचायती असून त्यापैकी ३६० ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. या केंद्रावरून नागरिकांना गाव पातळीवर ग्रामपंचायतीकडून मिळणारी आवश्यक प्रमाणपत्रे मिळविता येतात. मात्र त्यासाठी नागरिकांना प्रत्यक्ष ग्रामपंचायतीमध्ये जाऊन प्रमाणपत्रे मिळवावे लागत आहेत. त्यामुळे मुळगाव सोडून बाहेरगावी असलेल्या नागरिकांची मोठी अडचण निर्माण होत होती.

दरम्यान, शासनाने सेवा हक्क कायद्यांतर्गत आदर्श आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार हिंगोली जिल्ह्यातील ५६३ ग्रामपंचायतीमध्ये आदर्श आपले सरकार सेवा केंद्र स्थापन केले जाणार आहे. त्यासाठी १०१ ग्रामपंचायतीमध्ये आदर्श आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी घेतला. मराठवाड्यात सर्वात जास्त ग्रामपंचायतींची निवड जिल्ह्यात करण्यात आली असून यामध्ये काही ग्रामपंचायती ५ हजार लोकसंख्या असलेल्या गावांची आहे. यामध्ये पाचही तालुक्यातील प्रत्येकी २० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ग्रामपंचायतींना क्युआर कोड देण्यात आला आहे. नागरिकांनी कुठल्याही गावी बसून क्युआर कोड स्कॅन केल्यानंतर ॲप्लीकेशन खुले होईल. त्यातून नागरिकांना त्यांना हव्या असलेल्या प्रमाणपत्राची ऑनलाईन माहीती भरल्यानंतर काही दिवसांतच त्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे पूर्ण केली जात आहेत. त्यासाठी उपमुख्यकार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, केशव गड्डापोड, समन्वयक केदार चोपडे, गंगाधर लोंढे हे काम करीत आहेत. या सेवेमुळे नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. २८ एप्रिल सेवा हक्क दिनी या केंद्रातून प्रमाणपत्र देण्यास सुरूवात होणार आहे. त्यासाठी सर्व केंद्रांना क्यूआर कोड तसेच आवश्यक माहीती, युझर आयडी देण्यात आले आहेत. या केंद्रातून ग्रामपंचायतीचे जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, निराधार दाखला, मुल्यांकन प्रमाणपत्र, महसुल विभागाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाणपत्र डोंगरी प्रमाणपत्र आदी उपलब्ध होणार आहेत.

# अंभेरी साठवण तलाव शेतकऱ्यांसाठी वरदान- माचेवाड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**



अंभेरी साठवण तलाव हा सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून पूर्ण केला आहे. गेल्या १० वर्षांमध्ये या तलावाअभावी शेतकऱ्यांना पाणी मिळत नव्हते. आता मात्र अंभेरी तलावातील पाणी शेतकऱ्यांना उपलब्ध होणार असल्याने त्यांच्याही उत्पन्नात वाढ होत हा तलाव शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी केले.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत जलसंपदा विभागाच्या वतीने अंभेरी साठवण तलाव परिसरात जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचे उद्धाटन व जल-पूजन आज अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांच्या हस्ते जिल्ह्यातील तीनही मुख्य नद्यांतील (पूर्णा, कयाधू व पैनगंगा) पाण्याचे जलपूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अधीक्षक अभियंता तथा पालक अभियंता सुधाकर कचकलवार, कार्यकारी अभियंता आण्णाराव कांबळे, कार्यकारी अभियंता संतोष बिराजदार, कृषी उपसंचालक प्रसाद हजारे, उगमचे जयाजी पाईकराव, खानापूर चित्ताच्या सरपंच श्रीमती सुनंदाबाई वाघमारे, अंभेरीचे सरपंच रामेश्वर ठोके, विठ्ठलराव चौतमल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. कचकलवार यांनी १५ ते ३० एप्रिल, २०२५ या पंधरवाड्यात दररोज विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. तर इतर उपस्थित मान्यवरांनी पाण्याचा योग्य वापर करून तलावातील पाणी जलसंपदा विभागामार्फत रितसर परवाना प्राप्त करूनच वापरण्यात यावे. तसेच सर्वांनी पाण्याचे महत्व ओळखून पाण्याविषयी सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण करावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी तसेच जलसंपदा विभाग, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाच्या वेबसाईटचे उद्घाटन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाच्या वेबसाईटचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थमराठवाडाविद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर यांचेहस्ते करण्यात आले. तसेच परिक्षेत्रातील विविध पोलिस ठाण्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासावर निगराणी ठेवण्यासाठी ईगल आय क्राईम इन्वेस्टीगेशन मॉनिटरींग व कार्यालयीन टपालाचा जदल निपटारा व्हावा म्हणून संपूर्ण परिक्षेत्रातील ई-टपाल सेवा ही प्रणाली देखील चासकर यांचेहस्ते कार्यान्वित करण्यात आली.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व शासकीय कार्यालयांना १०० दिवसांचा सात कलमी कृती कार्यक्रम आखून दिला आहे. यास अनुसरून विविध पातळीवर कार्यालयीन सुधारणाचे व नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचे आधुनिकीकरण सुरू आहे. सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने परिक्षेत्रीय कार्यालयामार्फत सुरू करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहीती पोलिस उपमहानिरीक्षक शहराजी उमाप यांनी दिली.

नांदेड परिक्षेत्राच्या स्थापनेपासून या कार्यालयास स्वतंत्र अशी वेबसाईट नव्हती. परंतु आता या वेबसाईटमुळे नांदेड परिक्षेत्रातील नागरिकांना पोलिस कामकाजाशी निगडीत विविध माहीती अचूक व जलद गतीने मिळणार आहे. त्याचबरोबर नागरिकांना आपल्या तक्रारी मांडण्याची व गोपनीय माहीती पोलिसांना पुरविण्याची देखील व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गुन्हे तपास हे पोलिसांच्या अनेक कामांपैकी एक अतिशय महत्वाचे कामकाज आहे. पोलिस ठाणे पातळीवर दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची दैनंदिन निगराणी रहावी या दृष्टीकोनातून ईलग आय क्राईम इन्वेस्टीगेशन मॉनीटरिंग ही प्रणाली देखील नाशिक येथील माइंड सॉफ्टवेअर आयटी कंन्सल्टंसी यांचेमार्फत विकसित करण्यात आली आहे. परिक्षेत्रातील ९१ पोलिस ठाण्यात दाखल होणाऱ्या प्रकरणांची माहीती सदर प्रणालीत भरल्यामुळे गुन्हे तपासाच्या प्रत्येक टप्प्यावर निगराणी ठेवणे पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांना सुकर होणार आहे.

या व्यवस्थेसोबतच नांदेड परिक्षेत्रात ई-टपाल प्रणाली देखील कार्यान्वित करण्यात आली आहे. आजपर्यंत पोलिस उपमहानिरीक्षक कार्यालय व पोलिस अधीक्षक कार्यालय ही ई-टपाल व्यवस्थेने जोडण्यात आली होती. मात्र परिक्षेत्रातील अप्पर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी यांची कार्यालये व पोलिस ठाण्यांचे पातळीवर अशी प्रणाली उपलब्ध नव्हती. वर्धा येथील ग्रेस इन्सॉफ्ट प्रा लि. यांनी सदर कार्यप्रणाली नांदेड परिक्षेत्रासाठी उपलब्ध करून दिली असून त्यामुळे परिक्षेत्रातील ९१ पोलिस ठाणे व इतर क्षेत्रीय कार्यालये ऑनलाईन टपाल व्यवस्थेने जोडली जाणार असून त्यामुळे वेळेत व खर्चात मोठी बचत होणार असल्याची माहीती उपमहानिरीक्षक उमाप यांनी दिली. यावेळी पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, उपअधीक्षक आश्विनी जगताप यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### वार्ड भेट समस्या समाधन अभियान कार्यक्रम



हिंगोली- नगरपरिषद येथे विभागीय आयुक्त गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्ड भेट समस्या, समाधान अभियान नागरिकांसाठी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी हिंगोली येथील विविध वार्डातील महिला पुरुषांची संवाद साधला. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, नगर अभियंता प्रतीक नाईक अभियंता काकडे, अभियंता पुतळे, बाळू बांगर, विजय रामेश्वरे, विजय शाहू आदी उपस्थित होते. वार्ड भेट समस्या समाधन अभियान कार्यक्रमासाठी शहरातील विविध भागातील महिला, पुरुष यांनी सहभाग नोंदवला होता.

### १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी

हिंगोली- महाराष्ट्र शासनाने दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर सेवायोजन कार्यालयामध्ये सध्याचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली या विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य केले आहे. हिंगोली जिल्ह्यातील दहावी उत्तीर्ण तसेच पुढील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या सर्व उमेदवारांनी वरील संकेतस्थळाला भेट देवून आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीवेळी काही अडचण निर्माण झाल्यास ०२४५६-२२४५७४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली यांनी केले आहे.

### मागणीनुसार मुद्रांक पुरवठा उपलब्ध

हिंगोली- मुद्रांक कार्यालयाकडून साठा उपलब्ध झाला नसल्यामुळे वसमत येथील अधिकृत मुद्रांक विक्रेत्यांना ५०० रुपये मुद्रांकाचा तुटवडा भासत होता. परंतु जिल्हा कोषागारात प्रधान मुद्रांक कार्यालयाकडून माहे मार्च मध्ये मुद्रांक साठा उपलब्ध झालेला आहे. सध्या १०० रुपयाचे १ लाख ५६ हजार ९४३ आणि ५०० रुपयाचे २ लाख ३५ हजार ८८० एवढे नग संख्येत मुद्रांत जिल्हा कोषागारात आहेत. तसेच उप कोषागार अधिकारी वसमत यांना त्यांच्या मागणीनुसार मुद्रांक पुरवठा उपलब्ध करुन दिला आहे. तसेच महसूल मुद्रांक सुध्दा ३ लाख ९२ हजार २०० नग उपलब्ध आहेत. सध्या कोणत्याही अभिदानाचा तुटवडा नाही, असे जिल्हा कोषागार अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### ८९ वाहन चालकांवर कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या व वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८९ वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई करीत ६७ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

# लेट लतीफांना मुख्याधिकाऱ्यांची तंबी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

औंढा नागनाथ नगरपंचायत कार्यालयीन वेळ होऊन देखील अनेक कर्मचारी उशिराने येत असतात. याबाबत नगराध्यक्ष व नागरिकांनी तोंडी सांगितले यावरुन नगरपंचायतचे मुख्याधकारी गणेश गांजरे यांनी १६ एप्रिल बुधवार रोजी उशिरा येणाऱ्या कर्मचारी यांना धक्का दिला. उशिरा आलेल्या सर्वांना गेटच्या बाहेरच उभे करुन ठेवले होते. गेटला कुलूप लावण्यात आले होते. गेटबाहेर येऊन मुख्याधिकारी गणेश गांजरे यांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली.

नगरपंचायतचे मुख्याधिकारी गणेश गांजरे यांच्या निदर्शनास आले. या अनुषंगाने नगरपंचायतच्या मुख्य इमारतीचे प्रवेशद्वारे सकाळी ९.५० वाजता बंद करुन त्यांना कुलुप लावण्याचे आदेश मुख्याधिकारी गणेश गाजरे यांनी दिले होते. यामुळे उशिरा येणाऱ्यांना बाहेरच ताटकळत थांबण्याची वेळ आली. सकाळी-सकाळी नगरपंचायतच्या गेट कुलुप बंद दिसल्याने काही क्षण कर्मचाऱ्यांसह नागरिक ही बुचकाळ्यात पडले होते. सकाळी कामानिमित्ताने नगरपंचायतीत आलेले नागरिक देखील गेटला कुलूप असल्याने बाहेरच ताटकळत थांबले होते. मुख्याधिकारी गांजरे यांनी कर्मचाऱ्यांना तंबी देत सकाळी ९.४५ वाजता इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या आत येणे बंधनकारक राहिल. अतिमहत्वाच्या घरगुती कामामुळे अथवा अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयात येण्यास विलंब होणार असल्यास ९.३० वाजण्यापूर्वी विभाग प्रमुखांनी मुख्याधिकारी यांना वैयक्तिकरित्या व ईतर कर्मचारी यांनी नगरपंचायत कार्यालय या व्हाट्सअप ग्रुपवर कारणांसह कळवावे, असे केल्यास संबंधितांना कार्यालयात काही मिनिट उशिरा येण्याची मुभा मिळेल असे निर्देश मुख्याधिकारी गणेश गांजरे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिले.

# एक दिवस गावकऱ्यांसोबत उपक्रमाचे आयोजन




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १६ एप्रिल**

तालुक्यातील आसेगाव येथे दि १६ एप्रिल रोजी एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी दिलेल्या सूचनेनुसार ग्रामीण भागातील शासनाच्या विविध योजना उपक्रम व सेवा ग्रामीण भागात काम करणाऱ्या विविध ग्राम विकासांच्या अधिकाऱ्यामार्फत प्रत्येक गावामध्ये ठराविक कालावधीत पोहोचविण्याच्या अनुषंगाने एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार हा नावीन्यपूर्ण उपक्रम मा. विभागीय आयुक्त यांच्या ऑनलाईन वेबीनार द्वारे उपस्थितीत १६ एप्रिल रोजी आसेगाव येथे पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी तहसीलदार शारदा दळवी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड, सह गट विकास अधिकारी सुनील अंभुरे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सरपंच सौ पद्मीनबाई हिरामण मुळे ह्या होत्या. या कार्यक्रमास बाल विकास प्रकल्प अधिकारी सारिका सोरेकर,प्रभारी गट शिक्षण अधिकारी काष्टे, उप अभियंता गजानन नांदे, कृषीअधिकारी रामेश्वर गवळी, पशुधन विकास अधिकारी इंगोले, पंचायत विस्तार अधिकारी टी एल कोकरे, अशोक गोलेवार, माधवराव सूर्यवंशी, कृषि विस्तार अधिकारी आदिनाथ पांचाळ, स्वच्छ भारत अभियान कक्षाचे गट समन्वयक बी. सी. खंदारे, पशुधन पर्यवेक्षिक, समुदाय आरोग्य अधिकारी नंदा मोरे,कनिष्ठ अभियंता माधुरी तोंडाकुरे,आरोग्य सेवक पांचाळ, चकोतकर यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी/ कर्मचारी यांनी आपापल्या विभागात उपस्थित राहून ग्राम पंचायत तपासणी, आरोग्य शिबिर,पशूंचे लसीकरण बचत गटांना मार्गदर्शन, सार्वजनिक परिसर स्वच्छता, शालेय व अंगणवाडी येथे भेटी देऊन पाहणी केली. अधिकारी कर्मचारी यांनी गावातील नागरिकांनी मांडलेल्या अनेक समस्यांचे निराकरण गावातच केले. कार्यक्रमाप्रसंगी उपसरपंच उषाताई माधव भालेराव ग्राम पंचायत अधिकारी श्रीमती एम पी नागरगोजे आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा कचेरीसमोर दिव्यांगांचे अन्नत्याग आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

दिव्यांगासाठीचा दिव्यांग अधिनियम २०१६ चा कायद्याची अंमलबजावणी व्हावी तसेच विविध कार्यालयात मागील एक ते दिड वर्षापासून दिव्यांगांचे अर्ज धूळखात पडले आहेत. त्यांना संबंधित योजनांचा लाभ तत्काळ देण्यात यावा तसेच दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावा आदी मागण्यांसाठी दिव्यांग संघटनेच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात दिव्यांग आधार संघाचे पदाधिकारी व दिव्यांग बांधव यांनी सहभाग घेतला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



मुखेड- नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील प्रभू नगर, देवी नगर येथे तिव्र पीणी टंचाई निर्माण झाली आहे. (छाया- हाफिजखान पठाण, मुखेड)

# रांगोळीतून समाजप्रबोधनाची लयबद्ध अभिव्यक्ती - माजी महापौर मोहिनी येवणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ एप्रिल-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मीरा साहेबराव गायकवाड यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या भव्य रांगोळी स्पर्धेला महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला . यावेळी बक्षीस वितरण करताना नांदेड महानगरपालिकेच्या माजी महापौर मोहिनी यवनकर म्हणाल्या की, या रांगोळी स्पर्धेतून समाज प्रबोधनाची लयबद्ध अभिव्यक्ती व्यक्त करण्यात आली आहे . भारतीय संविधान आणि आजचा समाज याची जाणीव करून देणारी ही रांगोळी स्पर्धा निश्चितपणे प्रेरणादायी आहे असे मतही त्यांनी व्यक्त केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य रांगोळी स्पर्धा मीरा साहेबराव गायकवाड यांच्या संकल्पनेतून साकार झाली. या उपक्रमात बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव सुमनबाई लक्ष्मणराव गायकवाड यांनी सक्रिय सहकार्य केले. ही स्पर्धा पारंपरिक रांगोळी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित पोस्टर रांगोळी अशा दोन गटात घेण्यात आली.

यावेळी माजी महापौर मोहिनी ताई येवणकर आणि बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यावेळी रेखा भताने, शितल चव्हाण,रूक्मीनबाई इंदुरकर ,सविताताई कावळे, ऋतुजा मनाठकर , लिना गायकवाड, लक्ष्मी वाघमारे, शितल भवरे, कावेरी ढगे, रमेश कोकरे,राजेश बिऱ्हाडे, भीमराव सोनाळे, महेश एडके, दीपक गायकवाड, सुभाष मल्हारे, राजाराम सूर्यवंशी, मनीषा वैद्य, आम्रपाली कांबळे, नेहा जाधव ,विशाल भद्रे, सोपान काळबांडे ,अभिजीत हनवते आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेला नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. संपूर्ण सहयोग नगर परिसरातील अंगणांतून रेखाटलेल्या रांगोळ्यांनी परिसर फुलून गेला होता. बाबासाहेबांच्या कार्याचा आणि विचारांचा सुंदर रंगीत आरसा रांगोळ्यांतून उमटला. परीक्षकांनी घरोघरी जाऊन रांगोळ्यांचे परीक्षण केले. वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी होते.

या रांगोळी स्पर्धेत पारंपरिक रांगोळी या पहिल्या गटातून प्रथम क्रमांक उषा बाबुराव पाईकराव यांनी पटकावला तर द्वितीय पवनदेवी उतकर , तृतीय प्रियगंदा सुमित चौदंते यांनी क्रमांक मिळवला. उत्तेजनार्थ बक्षीस इतिश्री एडकेवार, आराधना सावंत यांनी मिळविले. या स्पर्धेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्र्यावर आधारित पोस्टर रांगोळी या दुसऱ्या गटात वैष्णवी अनिल पांचाळ (परभणी)यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय शिवराज श्रीदत्त पाटील , तृतीय एन. जी. वंजारे यांनी मिळवला. याच वेळी सुरेख अंकुश गवाले, आसावरी संतोष भोसीकर यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले आहे.

या आगळ्या वेगळ्या रांगोळी स्पर्धेत गोदावरी गंगाराम जंगीलवाड,मानसी संतोष पवळे,जयश्री गणेश इंदूरकर,सृष्टी संतोष वाघमारे,ऋतुजा गौरव मनाठकर,अर्चना सुधीर भुजबळ,मयुरी मोहन नरवाडे,यामिनी चव्हाण, रोहिणी वाघमारे, प्रिया राज इंगोले, धनश्री नागेश आवरे, अनुष्का अमित भुसारे यांच्या रांगोळ्या अत्यंत कल्पक आणि संदेशमूल्य रेखाटलेल्या होत्या. त्यांच्या क्रमांक न लागला तरी आयोजक आणि समितीने त्यांना उत्तेजनार्थ सन्मानचिन्ह व प्रमाण देऊन विशेष गौरविले. रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून जयश्री गोवंडे, डॉ. स्मिता नायर, अतुल येवतीकर,श्रीरंग खानजोडे, नागेश सोनकांबळे यांनी यशस्वी काम पाहिले.

मीरा साहेबराव गायकवाड यांच्या नेतृत्वात आयोजित रांगोळी स्पर्धेसाठी बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव सुमनबाई लक्ष्मणराव गायकवाड , जयाताई सूर्यवंशी, मंगलबाई कवडे, रेखा कोकरे, भारती बिऱ्हाडे, अस्मिता सोनकांबळे, सागरताई मल्हारे, आम्रपाली रणवीर, रोहिणी कांबळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सिडको येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रमाद्वारे अभिवादन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१६ एप्रिल-**

महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दिनांक १४ एप्रिल रोजी १३४ व्या जयंतीनिमित्त सिडको परिसरासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको तसेच व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघाच्या वतीने भीम जयंती मंडळाच्या पदाधिकारी यांचा सत्कार करून पिण्याचे पाणी वाटप करण्यात आले अशा अनेक विविध उपक्रमातून महामानव, बोधिसत्व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

सिडको हडको परिसरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकी दरम्यान विविध संघटना मित्र मंडळ यांच्या यांनी जागोजागी पिण्याच्या पाण्याची व अन्नदाना चा उपक्रम राबवून महामानवास अभिवादन करण्यात आले व तसेच व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना नांदेड दक्षिण यांच्यावतीने जिल्हाअध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली भीम जयंती मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते राजकीय नेते व कार्यकर्ते ,माजी जि.प.सदस्य मनोहर पाटील शिंदे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. नरेश रायवार यांच्यासह निळिशाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला व पाणी वाटप करण्यात आली या उपक्रमाचे उद्घाटन ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चचोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे



उपाध्यक्ष सूर्यकुमार यन्नावार, सचिव शिवाजी राजुरकर कोषाध्यक्ष तुकाराम सावंत कार्याध्यक्ष दिगंबर शिंदे सहसचिव सुरेश आंबटवार यांची उपस्थिती होती. सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे धम्म ध्वजारोहण विलास गजभारे व सामाजिक कार्यकर्ते सोनसळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. ललित शिंदे तसेच राष्ट्रवादीचे नांदेड शहर जिल्हाध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांनी आपल्या भाषणात बोलताना म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सुशोभीकरण करण्यासाठी किती निधी लागू आपण शासनाकडून मंजूर करून घेऊ असे आश्वासन दिले. तसेच हडको परिसरातील त्रिरत्न बुद्ध विहार पी-१ पी-२ येथे दक्षिण मतदार संघाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी येथील विहाराच्या सभागृहासाठी १० लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले. यावेळी जयंती मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाबासाहेब मस्के, देविदास लोणे, रमेश सावते यांची उपस्थिती होती. सिडको हडको परिसरातील जयंती निमित्त सकाळी १० वाजताच्या दरम्यान परिसरातील मुलींनी निळे फेटे बांधून दुचाकीवरून भव्य आशी मिरवणूक काढण्यात आली. व सायंकाळी जयंती मंडळाच्या मिरवणूका शांततेत पार पडल्या सदरील मिरवणीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# युवा सेनेच्या वतिने मोफत पाणपोई



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ एप्रिल-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ भिमराव रामजी आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मोफत जलसेवा शिवसेना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली युवासेनेचे तालुकाध्यक्ष नंदू पाटील इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, भीम जयंतीनिमित्त मिरवणुकीत येणाऱ्या भीमसैनिकांसाठी पाणपोईचे आयोजन करण्यात आले होते. या पाणपोईचे उद्घाटक पोलिस उपनिरीक्षक पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित आंबेडकरवादी चळवळीचे जेष्ठ नेते बालाजी खिल्लारे ,अनिल गायकवाड,राहुल हंकारे , युवासेना उपजिल्हाप्रमुख सचिन भैया जारिकोटे , यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला या कार्येक्रमासाठी युवासेना तालुका नंदाजी पाटिल इंगळे, शहरप्रमुख विजय चव्हाण गोविंद पाटील वडजे,सुरज गोविंदराव तेलंगे,रूपेश भैया पवार,भरत पा गायकवाड, देविदास पा मुरंबीकर, प्रताप पाटील वाकडे युवासेना तालुका सचिव नरेश पाटील घोरबंड आदी उपस्थित होते.



# बाबासाहेबांमुळे शोषित, उपेक्षितांना सन्मानाचे जिवन: आनंद मच्छेवार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१६ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सिद्धार्थ नगर येथील जेतवन बौद्ध विहारात उत्साहात साजरी करण्यात आली असून यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करून अभिवादन करण्यात आले. संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील शोषित, वंचित, उपेक्षित समाजाला सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम केले. असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी याप्रसंगी बोलताना केले आहे.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती सोहळा १४ एप्रिल २०२५ रोजी किनवट शहरांत ठिकठिकाणी विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. दरम्यान सिद्धार्थ नगर येथील जेतवन बुद्ध विहारात जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी किनवट नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोह करून सामूहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.या कार्यक्रमास आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते दादाराव कयापाक, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार,रिपाईचे नेते विनोद भरणे, के मूर्ती,माधवराव कावळे, मिलिंद सर्पे, उत्तम कानिंदे, रमेश मुनेश्वर, रविकांत सर्पे, ॲड. किशोर मुनेश्वर, गौतम नगराळे,निखिल कावळे, सुरेश कावळे,रवि कांबळे, सुगत नगराळे, एड. सम्यक सर्पे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून देशातील शोषित वंचित व उपेक्षित समाजाला सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम केले. भारतीय संविधानामुळे माझ्यासारख्या अल्पसंख्याक व उपेक्षित समाजातील व्यक्तीला नगराध्यक्षपदाची संधी उपलब्ध झाली. जयंती सोहळ्यानिमित्त मला पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्याचा मान मिळाला हे मी माझे भाग्य समजतो असे मौलिक प्रतिपादन माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी याप्रसंगी बोलताना केले आहे. या कार्यक्रमास सिद्धार्थ नगर व साठेनगर येथील आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### शिवम तुरटवाड यांची अभियांत्रिकी सहाय्यकपदी निवड

**नायगांव-** घुगंराळा येथील भुमिपुत्र शिवम तूरटवाड यांची अहमद पूर येथे अभियांत्रिकीच्या शाखेत नुकतीच सहाय्यकपद्दी निवड झाल्याबद्दल घुगंराळा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. नायगांव तालुक्यातील घुगंराळा नगरीचे भुमि पुत्र तथा सामाजिक कार्यकर्ते मोहनराव आत्माराम तुरटवाड यांचे सख्खे पुतणे शिवम सुरेश तुरटवाड यांनी प्रतिकूल परि स्थितीवर मात करीत अभ्यासातील सातत्यपणा कायम ठेवीत. जिद्द व मेहनतीच्या बळावर स्पर्धा परिक्षा मधून घवघवीत यश मिळवित पाटबंधारे विभाग लातूर शाखा अहमदपूर येथे सहाय्यक अभियंता पदी नुकतीच निवड झाली असून. त्या अनुषंगाने भगवान माली पा. सुगावे मित्र मंडळाच्या वतीने घुगंराळा येथे शिवम तूरटवाडचा, सहृदयी सत्कार करण्यात आला आहे. यावेळी, बालाजी बोंडले, गणपत गजभारे, दशरथ सुगावे, व्यंकट ढगे, बबन जगताप , दिगांबर गगांसागरे , सुरेश आत्माराव तूरटवाड , मोहन तूरटवाड , पोलीस पाटील राजेश तुरटवाड, बालाजी तूरटवाड, भिमेश्वर तुरटवाड, विकास कळकटवाड, अमोल कळकटवाड, शंकर तुरटवाड, प्रभात तुरटवाड, प्रदीप तुरटवाड, प्रणव श्रीकर तुरटवाड, नागेश बादलवाड, शंकर यमलवाड, संजय कोंडे, सलीम शेख, बारकू तूरटवाड, विलास बोंडले, मोहन ढगे, मारोती सुगावे, तिरुपती कासराळे, ऋषिकेश सुगावे, प्रल्हाद ढगे, लक्ष्मण कासराळे, अजीम शेख, पत्रकार दीपक गजभारे, पत्रकार माधव पवार, प्रफुल गायकवाड, शिवाजी तोटेवाड,मंगेश यनकफळे सह आदि प्रतिष्ठित मंडळी मोठ्या उपस्थित होते.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य अन्नदान व पाणी वाटप

**नांदेड** -सांगवी (बु) विमानतळ चौक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरा केली गेली. सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर जयंती मिरवणूकीतील तमाम बौद्ध उपासक-उपासिका यांना मा.नगरसेवक दत्ता पाटील कोकाटे, मा.नगरसेवक सदाशिव पुरी, प्रेमराज पाटील कोकाटे, चक्रधर पाटील कोकाटे यांच्याहस्ते अन्नदान तथा थंड पाणी वाटप करण्यात आले.

# हजुरी पाठी संघटनेच्या प्रयत्नांना यश

## प्रशासक विजय सतबीरसिंघ यांनी वाढविले पाठीसिंघांचे मानधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ एप्रिल-**

सचखंड गुरुद्वारा अंतर्गत भाविकांकडून च्या अखंड पाठ चे आयोजन करण्यात येते. यामध्ये मागील सतरा वर्षापासून पाठ करणाऱ्यांना मानधनात वाढ करण्यात आली नव्हती हजुरी पाठी संघटनेच्या वतीने प्रशासक डॉ. विजय सतबीरसिंघ यांना निवेदन देऊन मानधनात वाढ करण्याची मागणी केली होती. याबाबत प्रशासक सतबीरसिंघ यांनी सकारात्मक निर्णय घेऊन मानधनात वाढ केल्याने हजुरी पाठी संघटनेच्या प्रयत्नांना यश आल्याने सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

सिख धर्मियांचे दहावे गुरु श्री गुरुगोविंदसिंघजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत सचखंड श्री गुरुद्वाऱ्याचे अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यामुळे जगभरातील भाविक या ठिकाणी आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यानंतर विविध प्रकारचे पाठ आयोजन करतात. यात श्रीदशम ग्रंथ पाठ, जाप साहेब पाठ, अखंड पाठ, जपजी साहेब पाठ यांचा समावेश आहे. या कामांसाठी पाठीसिंघाच्या १७ वर्षापासून मानधनामध्ये वाढ करण्यात आली नव्हती. यापूर्वी २००९ मध्ये तत्कालीन प्रशासक डॉ.परविंदरसिंघ पसरिचा यांनी वाढ केली होती. वाढती महागाईमुळे या पाठीचे मानधन कमी पडत असल्याने हजुरी पाठी संघटनेने प्रशासकांना निवेदन देऊन मानधनात वाढ करण्याची मागणी केली असता त्यांनी गांभीर्याने दखल घेत मानधनात वाढ केली आहे.त्यामुळे सर्वत्र समाधान व्यक्त केले जात असून हजुरी पाटी संघटनेचे अध्यक्ष दलजितसिंघ बिशनसिंघ हजुरी पाठी, उपाध्यक्ष प्रदीपसिंघ जीतसिंग रागी, सचिव जगदिपसिंघ मोहनसिंघ नंबरदार, महेंद्रसिंघ पैदल, हुकमसिंघ काराबिन, देवेंद्रसिंघ महाजन व यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# ज्योतिबा फुले यांनी माणसाचे स्वभान जागे केले : सुरेशदादा गायकवाड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ एप्रिल-**

आपला भारत देश हजारो जातीसमुहांनी बनलेला देश आहे. आपले स्वभान नसलेल्या अनेक जाती आजही आपल्या देशात आहेत. परंतु ज्योतिबा फुले यांनी पिढ्यानपिढ्या अज्ञान, अंधश्रद्धा, खुळ्या समजुती आणि मानसिक गुलामगिरीत पशुहीन जीणं जगणाऱ्या इथल्या व्यवस्थेतील तळागाळातील माणसाचे स्वभान जागे केले असे प्रतिपादन येथील ज्येष्ठ आंबेडकरी नेते सुरेशदादा गायकवाड यांनी केले. ते भारतीय संविधान दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. यावेळी व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विषयक प्रश्नांचे अभ्यासक बालाजी



थोटवे तर प्रमुख अतिथी म्हणून इंजि. के. घनचक्कर, ओबीसी चळवळीतील कार्यकर्ते संतोष घटकार तसेच प्रज्ञाधर ढवळे, सटवाजी माचनवार, प्रा. डॉ. श्रीमंत राऊत, संजय मोरे, सतिश शिंदे, राजेश चिटकुलवार आदींची उपस्थिती होती.

येथील भारतीय पिछडा शोषित संघटन, लसाकम आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर दरमहा एक अशा व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या मालेतील पाचवे पुष्प येथील ज्येष्ठ आंबेडकरी नेते सुरेशदादा गायकवाड यांनी 'म. फुले यांचे समतेचे तत्त्वज्ञान आणि भारतीय संविधान' या विषयावर गुंफले. ते पुढे बोलतांना म्हणाले की, फुल्यांनी मांडलेले सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान आजच्या भारतीय संविधानात दिसत असले तरी ओबीसी समुहातील शेवटच्या माणसापर्यंत त्याचे कार्यान्वयन झालेले दिसत नाही. आजच्या सत्ताधाऱ्यांनी फुले आंबेडकरांचे आणि संविधानाचे तत्वज्ञान बाजूला ठेवून ओबीसींना न्याय देण्याची प्रक्रियाच कुंठित करून ठेवली आहे. या देशातल्या शेवटच्या माणसाला संविधान माहीत आहे का? असा प्रश्नही त्यांनी यावेळी विचारला. सरकारकडे सर्वसामान्यांच्या उत्थानाचा कार्यक्रमच नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**निवडणूक प्रक्रिया बदलणे गरजेचे**

आपल्या देशातील निवडणूक प्रक्रिया सदोष आहे. आजच्या राजसत्तेने धर्मसत्ता, न्यायसत्ता याबरोबरच निवडणूक प्रक्रियाही हाती घेतली आहे. सत्ता मिळवण्यासाठी सगळीकडे फेक नॅरेशनचा बोलबाला सुरू आहे. जाती धर्मात वेगवेगळ्या कारणांनी विषवल्ली पेरण्याचे काम सुरू आहे. ओबीसींसारख्या मोठ्या समुहाला सत्तेचे भागीदार बनणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी कणखर भूमिका घेतली पाहिजे. आरक्षणाचे समग्र धोरण लोकांपुढे आले पाहिजे. ओबीसींना त्यांचे राजकीय अधिकार मिळायलाच हवेत. त्यासाठी निवडणूक प्रक्रिया बदलणे गरजेचे आहे, असे गायकवाड म्हणाले. आरक्षणाचे उप वर्गीकरण हे मृगजळ आहे असे सांगून त्यांनी अनुसूचित जातींच्या वर्गीकरणाला विरोध दर्शविला.

# जिल्हा गुंतवणूक परिषदेला उत्तम प्रतिसाद, ९३० कोटीची सामंजस्य करार

## जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण राहिल यासाठी काम करा–उद्योग मंत्री उदय सामंत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ एप्रिल**

बीड जिल्ह्यात अधिक गुंतवणूक व्हावी यासाठी उद्योग विभागाने प्रयत्न करावेत तसेच मुख्यमंत्री रोजगार योजनेचे उद्दिष्ट पूर्ण होईल यासाठी काम करावे असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत केले. आज त्यांच्या उपस्थितीत ९३० कोटी ११ लाख रुपयांचे करार झाले.

उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्र तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तरीत्या या परिषदेचे आयोजन केले होते. येथील ग्रॅंड यशोदा हॉटेलमध्ये ही परिषद झाली.जिल्ह्यातील ७४ उद्योजकांनी केलेल्या या करारामुळे थेट तसेच अप्रत्यक्षरित्या ६०३६ जणांना रोजगार प्राप्त होणार आहे.

दिप प्रज्वलनाने या परिषदेची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर खा. सांदिपान भुमरे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, एमआयडीसीचे मुख्य अभियंता गावंडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक तसेच अनिल जगताप, राजेश देशमुख, उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव, व्यवस्थापक विजय काकड, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी.व्ही. फताटे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर व विश्वमाला इनकर यांनी केले.







बीड : शहरात नळाला वेळेवर पाणी येत नसल्याने टँकरची मागणी वाढत आहे. तसेच पिण्याचे पाण्याचे जार मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहेत. (छाया–कृष्णा शिंदे)

# चाईल्ड प्रायमरी स्कुल चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## विद्यार्थ्यांचा बहारदार कार्यक्रमाने जिंकली उपस्थित मान्यवरांची मने

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१६ एप्रिल**

केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कुल चे वार्षिक स्नेह संमेलन १३ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाचे उदघाटक म्हणुन रंजित दादा आडसकर तर अध्यक्ष म्हणून प्रा डॉ हनुमंत सौदागर, मुख्य अतिथी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मणजी बेडसकर साहेब व केंद्रप्रमुख चौरे साहेब उपस्थित होते. विविध क्षेत्रातील मान्यवर सरपंच, उपसरपंच, सदस्य, व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच सर्व पत्रकार मंडळी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





कार्यक्रमाचे प्रस्तावित संस्थेचे अध्यक्ष गिराम सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉक्टर नागेश जी कराळे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताजी मुजमुले व प्रकाश काळे यांनी केले तर रंजीत दादा आडसकर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देऊन शाळेच्या प्रगती विषयी गुणगान केले तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी कार्यक्रमास शुभेच्छा देऊन पालकांना मार्गदर्शन केले तसेच बाकी सर्व मान्यवरांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व अध्यक्षीय समारोप प्राध्यापक डॉक्टर हनुमंत जी सौदागर यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शिंदे मॅडम आंधळे मॅडम गिरी मॅडम पांचाळ मॅडम साखरे मॅडम चिंचोलीकर मॅडम भाऊसाहेब शिंदे सचिन गिराम भीमराव गिराम अनिल चटप बिरुदेव भंडारे, अनिल चटप, गणेश तपसे, प्रकाश काळे यांनी परिश्रम घेतले.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या सदाबहार कार्यक्रमाची सुरुवात ही प्रथम गणेश भक्ती गीताने झाली व नंतर पोवाडा, नाटिका, जनजागृती करणाऱ्या नाटिका यांवर विशेष भर देऊन शाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी मराठी गाण्यांवर नृत्य सादर करत उपस्थित मान्यवरांची पालकांची मने जिंकली.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये रविवारी ११ ते २ आस्थीरोग तपासणी मार्च

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ एप्रिल**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील.

# केज बसस्थानकात अक्षर सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवाराकडून पाणपोई चे लोकार्पण

**महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी सामाजिक उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१६ एप्रिल**

केज बसस्थानकात अक्षर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव दिनी मोफत पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.



डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी सत्याग्रह केला.तोच वारसा घेऊन आज भर उन्हाळ्यातली गरज ओळखून पाणपोई ची सुरुवात करण्यात आली. एप्रिल ते जून या कालावधीत नागरिकांना शुद्ध पाणी मोफत मिळणार आहे.दैनंदिन व्यवस्थापन श्री शरद गालफाडे करणार आहेत.

लोकार्पण कार्यक्रमास , केजपोलीस ठाण्याचे पोनि वैभव पाटील,आगार प्रमुख श्री चौरे ,गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, डॉ हनुमंत सौदागर,शिक्षणविस्तार अधिकारी सुनील केंद्रे,दत्ता चाटे,जयपाल मस्के ,जयदीप देशमुख, नितीन देशमुख,अश्रूबा सोनवणे,भारत हांगे, अक्षर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विष्णू यादव, जी बी गदळे,किशोर भालेराव,विक्रम डोईफोडे, ,युवराज हिरवे ,महादेव ढाकणे, अमोल बोबडे सुंदर डोईफोडे श्री अहंकारे, आदींची उपस्थिती होती. ए एम के डेव्हलपर्स यांच्याकडून पानपोळीसाठी एक महिन्याचा खर्च उचलण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पाटील यांनी बोलताना डॉ बाबासाहेबांचा जयंतीनिमित्त स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले.

माणुसकी जपणारा हा विचार असल्याचे मत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी अक्षर संस्था व शिक्षक मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम डोईफोडे यांनी केले आभार डॉ हनुमंत सौदागर यांनी मानले.

# अंबाजोगाई महाराष्ट्रातले तिसरे पुस्तकांचे गाव जाहीर

## उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ एप्रिल**

समस्त अंबाजोगाईकरांची बऱ्याच दिवसांपासून अपेक्षा होती की, अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव जाहीर करावे. याकरिता माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी महाराष्ट्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांनी वैयक्तिकरित्या कॅबिनेट मंत्री ना.उदय सामंत यांच्याकडे व माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे जुलै २०२४ मध्येही पत्राद्वारे मागणी केली होती. मोदी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून बुधवारी बीड शहरात उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत हे आले असता त्यांनी अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे जाहीर केले. यावेळी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह आद्यकवी मुकुंदराज ट्रस्टचे अध्यक्ष ह भ प किसन महाराज पवार, बीडच्या प्राचार्या डॉ दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ साहित्यीक सतीश साळुंके, कवी साळगावकर, अतुल कुलकर्णी, संजय देवळनकर, शिवसेनेचे सचिन मुळुक, अनिल जगताप हे उपस्थित होते.

याबाबत अधिक माहिती देताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहर हे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, नाट्य, क्रीडा, सहकार, ग्रंथ, परिवर्तनवादी चळवळीचे केंद्र आहे. येथे मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांची समाधीस्थळ आहे. ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी चे मंदिर आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर हे पर्यटनदृष्ट्या सक्षम असून लेखक, साहित्यिक व वाचन प्रेमी वर्ग या शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाचन संस्कृतीला बळ देणारे असे विविध उपक्रम वर्षभर अंबाजोगाईमध्ये राबविले जातात.

अंबाजोगाई ही मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज, प्रकांड पंडित सर्वज्ञ दासोपंत यांची कर्मभूमी आहे. तसेच कोकणस्थांची कुलदेवता माता योगेश्वरी देवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं गाव आहे. नैसर्गिक विविधतेने नटलेले गांव आहे. नदी, डोंगर, वनराई, पशु पक्षी यासोबतच मंदिराचे गांव म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व ज्यांनी केले ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लोककार्याची साक्ष देणारे हे गांव आहे. दिवंगत नेते प्रमोदजी महाजन, दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार बापूसाहेब काळदाते, माजी आमदार बाबुरावजी आडसकर, डॉ.द्वारकादास लोहिया, भगवानराव लोमटे बापू, डॉ.व्यंकटराव डावळे, रामकाका मुकादम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध क्षेत्रात अंबाजोगाईचा लौकिक सर्वदूर केला आहे.ज्येष्ठ साहित्यिक स्व.डॉ.एच.एन.मातेकर, रंगनाथ तिवारी, अमर हबीब, स्व.शैलाताई लोहिया, डॉ.नागरगोजे, दिनकर जोशी, दगडू लोमटे, बालाजी सुतार, मुकूंद राजपंखे, प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे,प्रा किरण कांबळे, प्रा.गौतम गायकवाड, बलभीम तरकसे,



विश्वांभर वराट गुरूजी, स्व.प्रा.संभाजी सावळकर यांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन चळवळीला बळ दिले आहे.

अंबाजोगाई शहरात बालझुंब्बड' सारखा उपक्रम मागील अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. 'बालझुंब्बड' मुळे नव्या पिढीला एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. 'बालझुंब्बड' ने हजारो विद्यार्थी घडविले आहेत. हे विशेष होय. अशा वैविध्यपूर्ण बाबींमुळे अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गाव समस्त अंबाजोगाईकरांच्या मागणीला मिळालेलं हे सर्वांत मोठं यश असून ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची बाब आहे.अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत बीड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल रोजी जाहीर केल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर मुकुंदराज समाधी परिसर हे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करावे व यासाठी वन विभागाकडील पाच एक्कर जागा ही मुकुंदराज संस्थानला उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर देखील वनमंत्री ना गणेश नाईक यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन यावर देखील सकारात्मक निर्णय घेण्याचा शब्द ना. उदय सामंत यांनी याप्रसंगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. त्याचबरोबर विवेकसिंधु हा ग्रंथ महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिद्ध करून तो ग्रंथ राज्यातील प्रत्येक वाचनालयात ठेवण्याची मागणी जेष्ठ साहित्यिक साळेगावकर यांनी यावेळी केली व ती मागणी देखील उदय सामंत यांनी तात्काळ मान्य केल्याचे मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई करांच्या या सर्व मागण्यांची पूर्तता केल्याबद्दल महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, माजी मंत्री दीपक केसरकर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकिशोर मोदी व मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी समस्त अंबाजोगाईकरांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

# राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने

## बाबासाहेबांच्या अनुयायांना पिण्याचे पाणी व शरबतचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ एप्रिल**





भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती मोठ्या हर्षोउल्हासात संपूर्ण देशभर साजरी करण्यात आली. अंबाजोगाई शहरामध्ये देखील बाबासाहेबांच्या अनुयायांनी शहराच्या विविध भागातून जयंती मिरवणूक काढली होती. हजारो अनुयायी या मिरवणुकीत सहभागी झाले होते. उन्हाळ्यात गरमीच्या वातावरणामुळे मिरवणुकीत सहभागी झालेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांची पाण्याविना गैरसोय होऊ नये या उद्देशाने राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने सामाजिक व सर्वधर्मीय सलोखा जोपासत डॉ बाबासाहेबांच्या शोभायात्रेत सहभागी झालेल्या भीम अनुयायांना पिण्याचे थंड पाणी तसेच थंड शरबतचे वाटप करण्यात आले.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मागील अनेक वर्षांपासून अंबाजोगाई शहरातील सर्व भीम अनुयायी मिळून काढत आले आहेत. यामध्ये हजारो महिला, पुरुष व तरुण युवक तथा युवती मोठया प्रमाणावर सहभागी होताना दिसून येतात. या मिरवणुकीतील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व प्रतिमांचे पूजन राजकिशोर मोदी यांच्या वतीने करून बाबासाहेब आंबेडकराना अभिवादन केले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणाऱ्या सर्व मिरवणुकीच्या अध्यक्षांचा सन्मान फेटा बांधून तसेच शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहरातील विविध भागांतील भीम अनुयायी तसेच नागरिक मोठ्या प्रमाणावर मिरवनूकी दरम्यान भीमाचा जयघोष करतांना आढळून आले. अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक भव्य असे व्यासपीठ तयार करून याच व्यासपीठावर जयंती उत्सव समित्यांच्या अध्यक्षांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. महादेव आदमाणे ,राजेंद्र मोरे यांनी यावेळी आपले मनोगत मांडले. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. बाबासाहेबांच्या जीवनाचे अनेक पैलू यावेळी लहान विद्यार्थ्यांसोबतच मोठ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उलगडले. या चिमुकल्या व्यक्त्यांचे विचार ऐकून व्यासपीठावरील अनेक दिग्गज अवाक झाले. त्यांचे मनोगत तथा संभाषण कौशल्य पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचारित्रावर आधारित विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा लवकरच आयोजित करण्याचा मानस राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

सामाजिक सलोखा , सर्वधर्म समभाव तसेच सामाजिक उत्तरदायित्व जोपासत भीम अनुयायांना थंड पाणी व थंड शरबत पुरवण्याची संकल्पना राजकिशोर मोदी मित्र मंडळाचे सहकारी तसेच माजी नगरसेवक महादेव आदमाणे यांनी मांडली व या संकल्पनेस तात्काळ संमती सर्वांनी दिली. बाबासाहेबांच्या मिरवणुकी दरम्यान मंडळाच्या सर्व कला पथकातिल कलाकारांची कला पाहण्यासाठी तयार करण्यात आलेल्या व्यासपीठावर राजकिशोर मोदी यांच्यासह मनोज लखेरा, महादेव आदमाणे, डॉ राजेश इंगोले,अमोल लोमटे, राजेंद्र मोरे, दिनेश भराडीया, सुधाकर टेकाळे, माणिक वडवनकर , जावेद गवळी,सुनील वाघाळकर, अकबर पठाण, अंकुश हेडे, विजय रापतवार, कैलास कांबळे, शाकेर काझी, खलील जाफरी, महेश कदम, सय्येद अमजद, रफीक गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, विशाल पोटभरे,सुमित आदमाणे, सुमित सुरवसे, सचिन गालफाडे, अस्लम शेख, सुशील जोशी, मुन्ना पठाण, तौसिफ सिद्दीकी, रोहन कुरे, शुभम लखेरा यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.